बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार,दि.१३ मे २०२५ | वर्ष४थे | अंक२६८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## थायलंडमधून आणलेल्या बुद्धमूर्तीची शिवणी येथे प्रतिष्ठापना



बीड:तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर येथे सोमवारी तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना व अनावरण सोहळा पार पडला.यावेळी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड तथा बुद्ध जयंती महोत्सवाचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो, कार्यक्रमाचे उदघाटक डॉ.भिक्खु उपगुप्त महाथेरो तर अध्यक्ष म्हणून डॉ.भिक्खु इंदवंस्स महाथेरो, प्रमुख उपस्थितीत भिक्खु चंद्रमुणी होते.प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु पय्यावर्धन तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस अधीक्षक नवनीत काँवत सीईओ आदित्य जीवने, नायब तहसीलदार सुहास हजारे, अधीक्षक अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे, इंजि बी. के. अदमाने उपस्थित होते.

# जिल्ह्यात अवकाळीचा हाहाकार

अनेक ठिकाणी झाडे उकडून पडली ▶ शहरातील पोलीस पेट्रोल पंपाची छत कोसळली ▶ राज्यातील अनेक शहराला यलो अलर्ट



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: हवामान खात्याने मराठवाड्यात अवकाळी पावसाची शक्यता वर्तवली होती. काल दुपारपासून मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला. बीड जिल्ह्यात ताशी ४० ते ५० वेगाने वारे वाहत होती यामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी घरांची पडझड तर झाडे उकडून पडली. अंबाजोगाई तालुक्यात वीज कोसळल्याने एका वृद्धाचा व म्हशीचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. विजेच्या कडकडाटसह बीड शहरातही अवकाळी पावसाने तब्बल एक तास झोडपले. या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान तर आंब्या व जांभूळ व इतर फळांचे नुकसान झाले. बीड शहरातील नगर रोडवर असलेल्या पोलीस पेट्रोल पंपाच्या छत कोसळून यामध्ये लाखोंचे नुकसान झाले. सुदैवाने यामध्ये जीवित हानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व परिस्थितीची संपूर्ण माहिती घेतली. शहरातील अनेक ठिकाणी झाडे उकडून पडली होती. शहरातील अनेक भागात पहिल्याच पावसात पाणी साचल्याने वाहनधारक व नागरिकांना त्रास सहन करावा लागला. बीड नगरपालिकेसमोर पाण्याचे तळे साचल्याने वाहनधारकांना पाण्यातून वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागली. यासह शहरातील अनेक भागात रस्त्यावर पाणी साचल्याने नगरपालिकेच्या स्वच्छतेची पोलखोल झाली.

.काही दिवसांपासून महाराष्ट्रात काही जिल्ह्यांमध्ये पावसासह वादळी वारे वाहत असल्याचं पाहायला मिळत आहे. काल सोमवारी कोकण–गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि ताशी ४०–५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली होती. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदूरबार, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूरमध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडू शकतो. जळगाव, नाशिक, नाशिक घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट परिसर, सांगली, सोलापूर, जालना, छत्रपती संभाजी नगर, बीड, धाराशिव, अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळमध्ये ३०–४० किमी प्रति वेगाने वादळी वारे वाहत होती. कोल्हापूर घाट परिसर, ▶ पान २ वर

## वादळी–वारा, पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी

### तातडीने पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: वादळी–वारा व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

सोमवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागात अचानक वादळी वार्यासह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नागरिकांचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने बीड विधानसभामतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी ▶ पान २ वर

### विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या सूचना

अचानकपणे जोरदार वादळी वारे सुटल्याने विद्युत वितरणाची व्यवस्था विस्कळीत झाली. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटल्या तसेच विद्युत खांब पडले आहेत. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागात तात्काळ वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही आ.संदीप क्षीरसागर यांनी विद्युत विभागाला दिल्या आहेत.

कारवाई | स्मार्टफोनचा स्मार्ट शोध

# नेकनूर पोलिसांनी शोधले १० गहाळ मोबाईल!

पुण्यभूमी प्रतिनिधी




नेकनूर: पोलिसांनी नागरिकांचे गहाळ झालेले मोबाईल तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने शोधून काढण्याचा अनोखा पराक्रम गाजवला आहे. वेगवेगळ्या कंपनींचे एकूण १० मोबाईल, ज्यांची किंमत सुमारे १,९२,००० रुपये आहे, हे शोधून मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत. नेकनूर पोलीस ठाण्यात नागरिकांकडून मोबाईल हरवल्याच्या तक्रारी वारंवार येत असल्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी सायबर डेक्सचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे आणि अमलदार पो.अ. दादासाहेब उबाळे, पो.अ. विशाल क्षिरसागर यांना तांत्रिक विश्लेषण करून मोबाईल शोधण्याचे आदेश दिले होते.

मोबाईल मिळाल्यानंतर नागरिकांनी नेकनूर पोलिसांचे आभार मानले आहेत. या यशस्वी शोधमोहीमेमुळे पोलिसांची जनमानसात चांगली प्रतिमा निर्माण झाली आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कौवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मिना यांच्या ▶ पान २ वर

## गाळ माफियांचा नंगानाच;विना नंबरच्या टिप्परने शेतकऱ्यांस उडवण्याचा प्रयत्न



पुण्यभूमी प्रतिनिधी

धारुर: धारुर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलिका धरणातुन अवैध गाळ उपसा चालु गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असुन हा गाळ उपसा माजलगावचे उपविभागीय अधिकारी व धारुरचे तहसीलदार यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याने महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी मुग गिळुन गप्प बसत आहेत.

काल दि.१२मे सोमवार रोजी कारी फाटा येथे पाऊस चालू असल्याने कारी येथील शेतकरी नितिन मोरे हे रस्त्याच्या कडेने चालत असताना गाळ माफियांच्या विना नंबरच्या टिप्परने या शेतकऱ्यांस उडवण्याचा ▶ पान २ वर

## व्यापारातून विस्ताराकडे

भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार पूर्णत्वास गेल्याने आपल्या मनुष्यबळाची ब्रिटनकडे निर्यात सुकर होईल, पण उत्पादित वस्तूंना काही बंधने पाळावी लागतील भारत आणि ब्रिटन यांच्यात मुक्त व्यापार कराराविषयी मतैक्य झाल्याच्या मध्यरात्रीनंतर भारताकडून 'ऑपरेशन सिंदूर' सुरू झाले आणि व्यापारी घडामोडींकडे स्वाभाविक दुर्लक्ष झाले. आज जवळपास आठवड्याभरानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रविराम झाला आहे. त्यामुळे मुक्त व्यापार सामंजस्याच्या महत्त्वाच्या विषयाची दखल घेणे समयोचित ठरेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात सत्तेवर आल्यानंतर जगातील सर्व देशांवर विविध तीव्रतेने आयात शुल्क अर्थात टॅरिफ लादण्याचे धोरण जाहीर केले. वर्षानुवर्षे इतर देशांनी आपला माल अमेरिकेत फुटकळ शुल्क भरून विकला. बदल्यात अमेरिकी मालावर त्यांच्या बाजारपेठांमध्ये भरमसाट शुल्क आकारले. ही अन्याय्य स्थिती बदलणारच, असे गर्जत ट्रम्प यांनी खरोखरीच शत्रुदेशांइतकेच मित्रदेशांवरही आयात शुल्क लागू केले. या धोरणात आर्थिक शहाणपण कमी आणि पोकळ राष्ट्रवादच अधिक होता. शहाणपणाची जाणीव झाल्यानंतर अनेक शुल्कांमध्ये कपात करण्यात आली किंवा त्यांवर अंमलबजावणी तहकूब झाली. ते काहीही असले, तरी अमेरिकेच्या या पवित्र्यामुळे जगभर द्विराष्ट्रीय व्यापार करार करण्याची निकड निर्माण झाली. यातूनच काही वर्षे वाटाघाटींमध्ये अडकलेला भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार पूर्णत्वास नेण्याचे दोन्ही देशांनी मान्य केले. करारातील काही तपशील अद्याप स्पष्ट व्हायचे आहेत. भारतापाठोपाठ दोनच दिवसांनी अमेरिकेनेही ब्रिटनशी व्यापार करार केला. त्यातीलही बरेचसे तपशील अद्याप जाहीर झालेले नाहीत. ब्रिटनने घेतलेल्या पुढाकारामुळे युरोपीय महासंघानेही भारताशी व्यापार करार करण्याची लगबग चालवली आहे. या समूहाची एकत्रित आर्थिक ताकद ब्रिटनपेक्षा मोठी आहे. हे सगळे सुरू असताना अमेरिकेकडूनही भारताला व्यापार करार पूर्णत्वास नेण्याविषयी 'प्रेमाची गळ' घातली जाण्याची शक्यता दाट आहे. वर्षानुवर्षे बंदिस्त अर्थव्यवस्था आणि सुरक्षित बाजारपेठा राबवलेल्या भारताच्या दृष्टीने इतक्या मोठ्या अर्थव्यवस्थांबरोबर मुक्त किंवा बहुतांश मुक्त व्यापार करताना, काही पथ्ये पाळावी लागतील नि काही व्यापारी तटबंद्यांचा त्याग करावा लागेल. यातून आर्थिक लाभ किती होतो हे स्पष्ट नाही. तरीदेखील विशिष्ट परदेशी माल भारतीय बाजारपेठांमध्ये काही किंवा बऱ्याच प्रमाणात स्वस्त होईल. त्याचा सामना करण्याची येथील कृषी आणि लघु व मध्यम उद्योग क्षेत्रांची आर्थिक आणि मानसिक तयारी कितपत आहे, याचे काही आडाखे सरकारने बांधलेले असतीलच. जगात कोणत्याही देशांमध्ये व्यापार करार होऊन शुल्ककपात झाली की सौम्य, मध्यम आणि तीव्र अशा सर्व प्रकारच्या प्रतिक्रिया संबंधित देशांमध्ये उमटतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. विद्यमान भाजप नेतृत्व निवडणुकांकडे अत्यंत गांभीर्याने पाहणारे आहे. त्यामुळे आर्थिक आणि राजकीय लाभांमध्ये समतोल साधण्याची कसरत सरकारला करावी लागणार आहे. प्रथम भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार कराराविषयी. जगातील पाचव्या आणि सहाव्या मोठ्या अर्थव्यवस्थांदरम्यान झालेला हा करार दोन्ही देशांसाठी महत्त्वाचा आहे. भारताने प्रथमच एखाद्या मोठ्या देशाशी अशा प्रकारचा करार केला. तर ब्रिटनकडून 'ब्रेग्झिट'पश्चात होत असलेला हा सर्वांत मोठा व्यापारी करार होता. या करारानुसार, येत्या काही वर्षांत ब्रिटनमधून भारतात आयात होणाऱ्या ९० टक्के वस्तूंवर कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची शुल्ककपात होईल. तर भारताकडून ब्रिटनला निर्यात होणाऱ्या ९९ टक्के वस्तूंवरील शुल्कात विविध दरांनी कपात केली जाईल. या करारान्वये दोन्ही देशांमधील ३४०० कोटी डॉलरची (जवळपास तीन लाख कोटी रुपये) वृद्धी होण्याचा आडाखा आहे. भारतातील कापड, फळे व भाजीपाला, मांस, मासे, चामडे, वाहनांचे सुटे भाग, दागिने या क्षेत्रांमधील निर्यातदारांना यातून लाभ होणे अपेक्षित आहे. तर ब्रिटनमधील मद्या आणि वाहन उद्योगाला भारतीय बाजारपेठ या शुल्ककपातीच्या अंमलबजावणीनंतर उपलब्ध होणार आहे. जी थोडीफार आकडेवारी प्रसृत झाली तिचा आधार घेतल्यास व्हिस्की व जिन या मद्यांवरील १५० टक्के आयात शुल्क ७५ टक्क्यांवर आणले जाईल. पुढील काही वर्षांमध्ये ते ४० टक्क्यांवर आणण्याचे प्रस्तावित आहे. ब्रिटनमध्ये उत्पादित होणाऱ्या काही मोटारींवरील आयात शुल्क १०० टक्क्यांवरून टप्प्याटप्प्याने १० टक्क्यांवर आणले जाणार आहे. पण या निर्णयात अनेक कंगोरे आहेत. इंजिन क्षमता आणि मूळ किमतींचा विचार त्यात होईल. कमी किमतींच्या मोटारींना यातून वगळण्यात आले आहे, जेणेकरून भारतात या विभागात मोठ्या प्रमाणावर मोटारी उत्पादित करणाऱ्या कंपन्यांना फार मोठी झळ पोहोचणार नाही. याशिवाय ब्रिटनमध्ये कंपनीअंतर्गत बदलीवर गेलेल्या कर्मचाऱ्यांना तीन वर्षे सामाजिक सुरक्षा योगदानातून सूट देण्यात आली आहे. अशा योगदानाच्या निमित्ताने दुहेरी वेतन कपातीतून दिलासा मिळण्यासाठी हे करण्यात आले आहे. या तरतुदीला ब्रिटनमधून विरोध सुरू झाला आहे. कारण त्यामुळे ब्रिटिश कंपन्यांचा भारतीय कर्मचाऱ्यांवरील खर्च (कॉस्ट टू कंपनी) कमी होतो आणि भविष्यात अधिकाधिक कंपन्या स्थानिक म्हणजे ब्रिटिश कर्मचाऱ्यांऐवजी भारतीय कर्मचाऱ्यांना बदलीवर ब्रिटनमध्ये सामावून घेण्यास प्राधान्य देतील, अशी स्थानिकवाद्यांची तक्रार आहे.

वादाचे मुद्दे येथेच संपणारे नाहीत. सेवा क्षेत्रात ब्रिटिश कंपन्यांना भारतात प्रवेश देण्याबाबत मतैक्य होऊ शकलेले नाही. कायदा आणि लेखा या क्षेत्रांत कार्यरत असलेल्या ब्रिटिश कंपन्यांना भारतात अद्यापही प्रवेश नाही. या क्षेत्रांचे येथील अभ्यासक्रम उभे करण्यात ब्रिटिशांचे योगदान आणि या क्षेत्रांसाठी दोन्ही देश इंग्रजीच वापरत असल्याने होणारी सोय आणि ब्रिटनने या क्षेत्रांत केलेली प्रगती या पार्श्वभूमीवर असा प्रवेश मिळावा ही ब्रिटनची वर्षानुवर्षांची मागणी आहे.

# परळी सत्ताधाऱ्यांना घरचा आहेर!

## दीपक देशमुख:परळी पालिकेत भ्रष्टाचार

पुण्यभूमी प्रतिनिधी परळी:मागच्या दहा वर्षापासून आमदार धनंजय मुंडे यांच्या ताब्यात असलेल्या परळी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राहिलेल्या दीपक देशमुख यांनी निवेदन देऊन परळी नगर परिषदेमध्ये झाले असलेल्या व होत असलेल्या भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. हा नक्कीच सत्ताधाऱ्याला घरचा आहेर असल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी म्हटले आहे.

परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की परळी शहरांमध्ये सरस्वती नदीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले



असून ब्लॅक लिस्टमध्ये असलेल्या गुत्तेदाराला काम दिलेल आहे तसेच परळी शहरांमध्ये करोडो रुपये खर्चून ड्रेनेजचे जे काम झालं आहे त्यामध्ये खूप मोठा भ्रष्टाचार झाला आहे सगळ्यात महत्त्वाचा की परळीतल्या एका रोडवरती अनेक वेळा बिल उचलण्याचा आम्ही ऐकत होतो पण आज माझी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांची मुलाखत ऐकली असता त्यांनी असं सांगितलं आहे की चांगल्या क्वालिटीचे रस्ते झाले असते तर सात मजली परळी शहरांमध्ये रस्ते झाले असते एवढा भयानक मोठा भ्रष्टाचार रस्त्याच्या कामामध्ये ही झाला आहे याच्यातून एक सिद्ध होत आहे की यापूर्वी परळी नगर परिषदेच्या विरोधामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ,संभाजी ब्रिगेड, वंचित बहुजन आघाडी, एम आय एम ,महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कम्युनिस्ट पक्ष यांच्यासह शहरातील काही सामाजिक कार्यकर्ते छोट्या-मोठ्या सामाजिक संस्था संघटना यांनी नगरपरिषदेच्या भ्रष्टाचारा विरोधात वारंवार निवेदन दिली आंदोलन केले हे अगदी खरे होते. असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी म्हटले आहे.

म्हणून परळी नगर परिषदेच्या विरोधामध्ये माजी नगराध्यक्ष यांनी जे भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे व दोषीवर कडक कारवाई करावी अशी मागणी सुद्धा परळीकरांच्या वतीने करण्यात येत आहे. जर असं नाही झालं तर यामध्ये सत्ताधारीच काहीतरी षडयंत्र करून पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी खाटाटोप करत आहेत का काय? अशा पद्धतीची शंका परळीकरांच्या मनामध्ये नक्कीच आल्याशिवाय राहणार नाही म्हणून या प्रकरणाची या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी असे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी म्हटले आहे.

# माहेश्वरी समाजाच्या वतीने कॅन्सर लसीकरण

अंबाजोगाई/प्रतिनिधी

श्री बांगड माहेश्वरी मेडिकल वेलफेअर सोसायटीच्या सहकार्याने महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा व बीड जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने अंबाजोगाई तालुका माहेश्वरी सभेकडून ९ ते १४ वयोगटातील बालक व १५ ते २६ वयोगटातील तरुण-तरूणींचे कॅन्सर लसीकरण दि. ११ व १२ मे रोजी येथील भुतडा हॉस्पीटल मध्ये संपन्न झाले.



या लसीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. शुभदा लोहीया (राठी) यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष ॲड. श्रीकृष्ण तोष्णीवाल, पूनम जाजू, संजय सोनी, डॉ. मनिषा भुतडा, डॉ. अनिल भुतडा उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कविता मुंदडा व राजश्री मुंदडा यांच्या महेश वंदनाने झाली. यावेळी बोलताना डॉ. शुभदा लोहीया म्हणाल्या की, भारतात कॅन्सरने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कोणत्याही आजारावर उपचाराऐवजी प्रतिबंध हा महत्वाचा असतो. मागील काही वर्षात भारतात कॅन्सरवर लस उपलब्ध झाल्या आहेत. मात्र त्या महाग असल्याने सामान्य माणसाला न परवडणाऱ्या आहेत. बांगड माहेश्वरी मेडिकल वेलफेअर सोसायटीने ही लस माफक दरात उपलब्ध करून दिली आहे, याचा लाभ माहेश्वरी समाजातील सर्व लाभार्थ्यांनी घ्यावा असे आव्हान त्यांनी केले.

यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तप्रसाद लोहिया, संचलन सतीश तोष्णीवाल यांनी केले तर आभार विजय नावंदर यांनी मानले. कार्यक्रमाचा शेवट भारतीय शहीद जवान, पहलगाम मधील यात्रेकरु शहिदांना श्रद्धांजली देवून राष्ट्रगीताने झाला. या लसीकरण कार्यक्रमात अंबाजोगाई तालुक्यातील एकूण १०५ जणांचे लसीकरण करण्यात आले. या लसीकरण कार्यक्रमासाठी जिल्हा सचिव जगदीश जाजू, तालुकाध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, डॉ. मनिषा भुतडा, डॉ. अनिल भुतडा, किरण भंसाळी, शिवकन्या रांदड, रेणू झंवर, उमा बजाज, संतोष भंडारी, कांतीलाल चोकडा, रामानुज मुंदडा, किशोर बाहेती, संजय सोनी, भुतडा, अंबाजोगाई तालुका माहेश्वरी महिला संघटन व अंबाजोगाई तालुका माहेश्वरी युवा संघटन यांचे सहकार्य लाभले.

# पाटोद्यात बुद्ध जयंती निमित्त शांतता, समता आणि करुणेचा जागर

पाटोदा/प्रतिनिधी

जगाला जर शांतता हवी असेल तर बुद्धाचे तत्व स्वीकारावे लागतील... युद्धाने कटूता वाढते तर बुद्धाने प्रेम वाढते, या विचारांचा जागर करत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती पाटोदा शहरात अत्यंत शांततेत,भक्तिभावाने आणि सामाजिक सलोख्याने साजरी करण्यात आली.या निमित्ताने भीमनगर येथील बुद्ध विहारात सकाळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. पंचशील ध्वज हा समतेचा, शांततेचा आणि करुणेचा प्रतीक असून, याच्या माध्यमातून तथागतांच्या शिकवणीचा प्रसार करण्यात आला.



ध्वजारोहणानंतर विहारात भगवान बुद्धांच्या प्रतिमेची विधीवत पूजा पार पडली.यानंतर बुद्ध मूर्तीची भव्य शांततेत मिरवणूक पाटोदा शहरातून काढण्यात आली. मिरवणुकीत विविध वयोगटातील बौद्ध अनुयायी, महिला, तरुण, बालगोपाळ यांनी सहभाग घेतला. डोक्यावर पंचशील ध्वज, हातात घोषवाक्यांचे फलक आणि डॉल-ताशांच्या गजरात मिरवणूक शहरातून मार्गस्थ झाली. जय भीम च्या घोषणांनी शहराचे वातावरण भारावून गेले होते. शहरातील नागरिकांनी मिरवणुकीचे विविध ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत केले. या शिस्तबद्ध व शांततेत पार पडलेल्या मिरवणुकीमुळे बौद्ध अनुयायांचे संघटन, संस्कृतीप्रेम आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली.मिरवणुकीनंतर बुद्ध विहारात सामूहिक पूजापाठ पार पडला. विशेष पूजेनंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी संयोजन केले.बुद्ध पौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो समतेचा, करुणेचा आणि शांततेचा जागर करणारा दिवस आहे. या निमित्ताने पाटोदा शहराने तथागतांच्या विचारांचा प्रसार करत अनुकरणीय आदर्श घालून दिला.

## पान एक वरून

**जिल्ह्यात अवकाळीचा**

कोल्हापूर, सातारा, सातारा घाट परिसर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदियामध्ये ५०-६० किमी प्रति तास वेगाने वादळी वारे वाहू शकतात. तर भंडारा, गोंदियासाठी कोणत्याही प्रकारचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला नाही. हवामान खात्याने दिनांक १४ मे रोजी मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात वेगाने वारे वाहतील व अवकाळी पाऊस पडणार असल्याचे सूचित केल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यात येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घेणे आवश्यक असून शेतकऱ्यांनी मशागतीचे कामे करत असताना अवकाळी पाऊस पडल्यास तत्काळ सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन राज्य शासनाकडून करण्यात आले आहे

**गाळ माफियांचा नंगानाच;विना नंबरच्या टिप्परने**

प्रयत्न केला हा गाळ माफियांचा नंगानाच सुरू असुन संतप्त ग्रामस्थांनी टिप्पर अडवून पोलीस अधीक्षकांना फोन करून माहिती दिली.तरी आता महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन या टिप्पर वर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यावेळी विना नंबरचे टिप्पर संतप्त ग्रामस्थांनी अडवून ठेवले परंतु महसूल प्रशासनाचा व पोलीस प्रशासनाचा एकही कर्मचारी देखील याकडे फिरकला नाही. यावरूनच दिसून येते की महसूल प्रशासनाचे व पोलीस प्रशासनाचे कर्मचारी व अवैध गाळ उपसा करणारे गाळ माफियांचे किती लागेबांधे आहेत यावरून दिसून येते. माजलगाव उपविभागीय अधिकारी व धारूर तहसीलदारांच्या आशिर्वादाने सर्रास कुंडलिका धरणातुन गाळ उपसा करत वीटभट्टी चालकांना विक्री केला जात आहे.यावर अनेक शेतकऱ्यांनी आवाज उठवून ही धारूर तहसीलदार काहीच कारवाई करत नसल्याने धारूर तहसील प्रशासनाच्या विरोधात ही शेतकऱ्यांत तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील शासनाने भूसंपादित केलेल्या जमिनीवरील अवैध गाळ उपसा हा मोठ्या प्रमाणात सुरू असून हा गाळ शेतकऱ्यांना न देता हा गाळ वीटभट्टी धारकांना विकला जात असून गाळ उपशासाठी तालुका प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी व गाळमाफिया यांचे संगणमत असून कोट्यावधी रुपयांच्या गाळासाठी लाखो रुपयांची डिल झाले असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे. यामुळेच महसूल प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे. जिल्हाधिकारी साहेब या गाळ माफियाला कधी आवर घालणार असा संतप्त सवाल शेतकरी करत आहेत तर महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन या विना नंबरच्या टिप्परवर काय कारवाई करणार का काही तरी ओले हात करून असेच सोडुन देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**वादळी-वारा, पावसाने झालेल्या**

विविध नुकसानग्रस्त ठिकाणी तात्काळ जाऊन पाहणी केली. झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वार्यामुळे शेतीचे तसेच नागरिकांच्या घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानींचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनस्तरावरून मदत करण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला आ.क्षीरसागर यांनी निर्देश दिले आहेत.

**नेकनूर पोलिसांनी शोधले १०**

मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, पोउपनि आप्पासाहेब रोकडे, पो.अ. विशाल क्षीरसागर, पो.अ. दादासाहेब उबाळे आणि टेक्निकल ॲनालिसेस सेल बीडचे पोलीस अमलदार विक्की सुरवसे यांनी केली.नेकनूर पोलिसांचा हा पराक्रम निश्चितच अभिमानास्पद आहे!

## पान सहा वरून

**पाटोद्यात अवकाळी पावसाचा**

अशक्य झाले. नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, अनेकांनी शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडण्याची चिंता आता डोके वर काढत आहे. शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत आणि योग्य ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. तालुका प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी स्थानिकांची मागणी आहे.हवामानातील या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा संकट उभं राहिलं असून, शासनाच्या मदतीशिवाय सावरणं कठीण असल्याचे स्पष्ट होत आहे.

**धामणगाव परिसराला**

अक्षरश: दाणादाण उडाली. या पावसाने शेतात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. शेतात काढून ठेवलेला कांदा आणि वाळण्यासाठी टाकलेल्या भुईमुगाच्या शेंगा झाकण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी त्रेधातिरपीट उडाल्याचे दिसून आले. सलग दोन ते अडीच तास झालेल्या जोरदार पावसामुळे या परिसरात चाऱ्याच्या गंजी तर काही ठिकाणी घरावरचे पत्रे उडाले असल्याचे धामणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब निकम यांनी प्रतिनिधीला सांगितले.

**मलकापूर दत्त मंदिराचा**

दत्त मंदिर संस्थान अस्तित्वात नसताना देवस्थान ट्रस्टीचे खोटे दस्तऐवज,प्रोसोडिंग घेऊन सातबाराच्या आधारे फेरफार करण्यात आल्याचा शेतकरी सुंदर लोमटे यांचा आरोप असून फेरफार करण्यासाठी सर्व दिलेली कागदपत्रे बनावट असल्याचे म्हटले आहे वारंवार कागदपत्रे पुरावे सादर करूनही दंडाधिकारी महसूल विभागाने चुकीचा निर्णय देऊन फेरफार केल्याने हा फेरफार खोट्या कागद पत्रावरून व आर्थिक व्यवहार करून केला असल्याचे सुंदर लोमटे यांचे म्हणणे असून याप्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी दिनांक ८ मे पासून मलकापूर येथील सुभाष महाराज लोमटे यांच्या समाधीस्थळी आमरण उपोषणाला बसले असून आज पाचवा दिवस आहे तरीपण कुठल्याही प्रशासनाचे अधिकारी किंवा कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांनी उपोषण स्थळी भेट दिली नाही श्रीक्षेत्र दत्त मंदिर मलकापूर येथे हे चुकीच्या पद्धतीने फेरफार क्रमांक ६६३ सातबारावर घेण्यात आलेला आहे खोटी कागदपत्र बनवून दस्तऐवज दाखल करून फेर घेण्यात आलेला आहे बनावट कागदपत्रे दाखल करणारे व फ `रफार तयार करणारे संबंधित अधिकारी यांच्यावर ४२० चे गुन्हे दाखल व्हावे म्हणून उपोषणाला बसलेले सुंदर यांचा आजचा पाचवा दिवस आहे दोन दिवस वादळीवाऱ्यासह प्रचंड पाऊस आला तरी देखील ते जागेवरून हल्ले नाही भर पावसात देखील त्यांचे उपोषण त्यांच्या न्याय मागण्यासाठी चालू आहे याची प्रशासनाने अद्याप दखल घेतलेली नाही त्यामुळे प्रशासनावर सुंदर लोमटे यांच्यासह मलकापूर येथील ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे प्रशासन काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

**बुद्धांनी जगाला विज्ञानवादी**

स्थापन केलेल्या धर्माला बौद्ध धर्म असे म्हणतात या कार्यक्रमात श्री गजानन जाधव श्री सुदन अंभोरे यांनीही आपले विचार मांडले याप्रसंगी कैलाश अंभोरे, सिद्धार्थ अंभोरे, श्रीकांत मादनकर, तानाजी मापारी, विनायक मापारी, लूकमान कुरेशी, अमोल सुटे, भारत राठोड, मंगेश मोरे, योगेश भुक्कन, संजय नेवरे, लक्ष्मण डोंगरदिवे, दीपक अंभोरे, उमेश मोरे, कैलास मोरे, शुभम मोरे, विनोद सरदार आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानाजी अंभोरे यांनी केले तर आभार कैलास अंभोरे यांनी मानले आणि प्रसाद म्हणून खीर वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**जगाला युद्ध नाही तर**

आकाश घेवंदे,सागर पनाड, राजेश जावळे, निवृत्ती जावळे, राजहंस जावळे, गौतम पनाड, राजरत्न पनाड , डि.के.पनाड, सुधाकर पनाड ,राजेश जावळे, सुबोध घेवंदे, राहुल शेजुळ, गजानन जावळे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागवंशी संघटन, भीम योद्धा ग्रुप, माता रमाई महिला मंडळ यांनी परिश्रम घेतले

**पाटोदा शहरात बुद्ध**

संजय जावळे, डॉ. नरेंद्र जावळे, रमेश जावळे, सूर्यकांत जावळे पाटील, यांच्यासह महिला उपासिका आणि शहरातील अनेक मान्यवर, नागरिक व धम्मनिष्ठ बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बौद्ध समाजाच्या कार्यकर्त्यांनी उत्कृष्ट संयोजन केलेल्या या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी तथागत बुद्धांच्या करुणा, अहिंसा, समता आणि शांतीच्या विचारांचा जागर करत समाजात बंधुता व सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचे आवाहन केले.

**परमार्थात खरे सुख**

गायणाचार्य, भालदार ,चोपदार, विणेकरी तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान पुढे बोलताना सुरेशानंदजी शास्त्री म्हणाले की, जीवनात साधू संतांच्या आशीर्वादाची गरज आहे. आज खऱ्या अर्थाने साधू संतांच्या कृपेने भव्य दिव्य सप्ताह झाला. हे सर्व श्रेय आडगावकराचे आहे. तसेच आई वडिलांची , साधू संताची सेवा करा असे आवाहन त्यांनी शेवटी बोलताना व्यक्त करुन श्रृंगऋषी गडाच्या पहिल्या नारळी सप्ताहाची उत्साहात सांगता झाली, सांगता सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी गडाचे टाळकरी, वारकरी, मृदंगाचार्य, गायणाचार्य , भालदार, चोपदार, विणेकरी सह पंचक्रोशीतील भजनी मंडळ उपस्थित होते. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थ मंडळी, आडगाव यांनी आठ दिवस परिश्रम घेतले.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com




## भाजपाचा भारतासाठी जल्लोष उपक्रम उत्साहात

**डोंबिवली :** डोंबिवली भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नुकताच भारतासाठी जल्लोष या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सदर जल्लोष इंदिरा चौकात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ऑपरेशन सिंदूर यशवी झाले त्याचे औचित्य साधून नुकतेच ढोल-ताशा गजरात, रॅली-गुलाललांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि श्रीराम मंदिराच्या प्रतीकृतीस रथयात्रा यांच्या समवेश जल्लोष आमदार तथा प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण नेतृत्वाखाली कार्यकत्यांनी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचा उद्देश भाजपाच्या विविध राज्यांतील यशाचे अंमलबजावणी ऑपरेशन सिंदूर निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानणे. सदर जल्लोष भाजपचे नेते शशिकांत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकत्यांनी सहभागी होऊन जल्लोष केला त्यावेळी महिला आघाडीच्या भारती ताम्हणकर, वर्षा परमार, आनघा पवार, सुनीता दांडेकर, खुशबू चौधरी इत्यादी कार्यकर्ते विसू पेडणेकर, पूर्व मंडळध्यक्ष मितीश पेणकर, संजीव बिरवडकर, बाळा पवार, आनंद आगरवाल, राजन आभाळे, पप्पू म्हात्रे, पंढरीनाथ म्हात्रे आदि असंख्य भाजपा नेते व कार्यकर्ते उपस्थित राहून जल्लोष करत होते.

# भारतीय सैन्याबाबत गैरसमज पसरवणाऱ्यांची चौकशी करा

### शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांची केंद्र सरकारकडे मागणी

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

'ऑपरेशन सिंदूर'वर व भारतीय लष्कराच्या पराक्रमाबाबत लोकांमध्ये संशय निर्माण करणारे उबाठा प्रवक्ता आणि अरविंद सावंत यांची चौकशी करुन त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी केली आहे. भारतीय लष्कराच्या कारवाईवर संशय घेणारे उबाठाचे प्रवक्ते आणि अरविंद सावंत या दोन्ही खासदारांच्या तोंडून पाकिस्तानची भाषा बाहेर पडत असून ते पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते बनले आहेत, अशी सडकून टीका खासदार म्हस्के यांनी केली. ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




खासदार म्हस्के म्हणाले की, गेले दोन दिवस भारतीय लष्कराच्या कारवाईवर संजय राऊत आणि अरविंद सावंत संशयास्पद परिस्थिती निर्माण करत आहेत. पाकिस्तानी लष्कर, पाकिस्तानी राज्यकर्त्यांची भाषा राऊत आणि सावंत यांच्या तोंडून बाहेर पडत आहे. 'गिरे तो भी टांग उपर', हे कोणाला उद्देशून आहे, असा सवाल खासदार म्हस्के यांनी अरविंद सावंत यांना केला. भारताच्या हवाई दलाचे वैमानिक दक्ष असून आदेशाची वाट पाहत आहेत. 'गिरे तो भी टांग उपर' म्हणणे हा या वैमानिकांचा अपमान नाही का? अरविंद सावंतने या वक्तव्यावर ताबडतोब स्पष्टीकरण द्यावे, असा इशारा म्हस्के यांनी दिला. भारतीय लष्कर हे हिंदुस्थानचे लष्कर आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवायचा सोडून पाकिस्तानची भाषा काय बोलताय, अशा शब्दांत खासदार म्हस्के यांनी उबाठा खासदारांवर बोचरी टीका केली. भारतीय लष्कराबाबत राऊत आणि सावंत यांनी केलेली वक्तव्यांचा प्रत्येक नागरिकाने तीव्र निषेध करायला हवा, असे ते म्हणाले. भारतीय सैन्य हे कोणा पक्षाचे नाही, तर देशाचे सैन्य आहे. त्यामुळे लष्करावर तुम्ही विश्वास ठेवायला हवा. लष्कराने फोटोसकट, व्हीडिओ सकट पुरावे दिले तरी तुम्ही त्यांच्याबाबत गैरसमज पसरवता हा एकप्रकारे लष्कराचा अपमान असून तो देशद्रोह आहे, असे खासदार म्हस्के म्हणाले. मुंबईत २००६ मध्ये झालेले लोकल ट्रेनमधील बॉम्बस्फोट आणि २००८ मध्ये झालेला मुंबईवरील दहशतवादी हल्ल्या त्यावेळी राऊत यांना इंदिरा गांधी यांची आठवण का नाही आली, असा सवाल खासदार म्हस्के यांनी केला. त्यावेळी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग होते, मात्र कारभार सोनिया गांधी चालवत होत्या. त्यावेळी पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक का नाही केला, असा प्रश्न राऊत हे सोनिया गांधी यांना विचारतील का, असे खासदार म्हस्के म्हणाले. भारतीय सैन्याच्या कामगिरीवर संशय निर्माण करणे हे देशद्रोह आहे. यांच्या वक्तव्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी खासदार म्हस्के यांनी केली.

**रावळपिंडी किंवा लाहोरमधून निवडणूक लढवा !**

उबाठा प्रवक्ते आणि अरविंद सावंत यांनी भारतीय लष्कराच्या शौर्यावर संशय व्यक्त केला. लष्कराच्या कामगिरीवर संशय व्यक्त करून राजकारण करणाऱ्या राऊत आणि सावंतला ही ग्रामपंचायत, जिल्हा परिषद किंवा महापालिका निवडणूक वाटली का? पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्या राऊत आणि सावंत यांना रावळपिंडी किंवा लाहोरमधून खासदारकीची निवडणूक लढवायची आहे का, असा संतप्त सवाल खासदार म्हस्के यांनी यावेळी केला.

**मुरबाडमध्ये २०० लग्नांचा बार उडाला...!**

## उष्णतेचा तडाखा तरीही लग्नसराईचा धुमधडाका

◆ **मुरबाड (प्रतिनिधी):**

मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भाग तसेच मुरबाड शहर परिसरात मोठा प्रमाणात उष्णतेचा तडाखा असला तरीही शहरी व ग्रामीण भागात लग्नसराईचा धुमधडाका पाहायला मिळत आहे, तर मुरबाड तालुक्यातील कोरावळे येथील भास्कर नारायण धुमाळ यांनी आपल्या कन्येचा लग्नाचा विधी एकच दिवसात अर्थात उटणे, हळदी, आणि लग्न समारंभ एकाच दिवशी पार पडला आहे. एक दिवशी लग्न समारंभात खर्चाची मोठी बचत होते त्यामुळेच भास्कर धुमाळ यांनी एक दिवशी लग्नाला पसंती दिली त्यामुळे भास्कर धुमाळ यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुरबाड तालुक्यातील सरळगाव, म्हसा, शिवळे, टोकाकडे, धसई, शिवळे या विभागातील तसेच परिसरातील जवळपास मार्च एप्रिल, मे २०२५ या महिन्यादरम्यान जवळपास २१७ लग्नांचा बार उडला आहे याचा अर्थ असा की २१७ जोडपी विवाहबद्ध झाल्याची माहिती मुरबाड तालुक्यात प्रसिद्ध भटजी मोहन (तात्या) रत्नाकर यांनी दिली आहे. या सर्व लग्न समारंभात सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी वधू- वरास मोठ्या प्रमाणात शुभेच्छा देताना चित्र दिसून आले आहे. मात्र गेल्या आठवड्यापासून हळदी व लग्न समारंभावर पावसाचे सावट असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यातच पूर्वी लग्न सकाळी किंवा दुपारी लागायची; परंतु आता कडक उन्हाळ्याचा अंदाज बघून सर्वत्र लग्नही संध्याकाळच्या सुमारास




लागतात त्यातच संध्याकाळी पाऊस आल्याने लग्न सोहळ्यात मोठी तारांबळ उडाल्याचे चित्र दिसून येत आहे. ३१मे पर्यंत लग्नाचा मुहूर्त असल्याने त्यासाठी वाजंत्री, कॅटर्स, स्वयंपाकी, यांना जरी सुगीचे दिवस येणार असल्याने तरी तेही वेळेवर मिळेना अशी परिस्थिती होणार आहे. कारण यांची लग्न जमले आहेत त्यांनी एक ते दीड महिन्यांपूर्वी ऑर्डर्स बुकिंग केले आहेत मुरबाड सारख्या ग्रामीण भागातील सरळगाव, टोकावडे, म्हसा धसई, शिवळे तसेच मुरबाड शहर या प्रमुख बाजारपेठेमध्ये लग्नसरासाठी किराणा दुकान, कपड्याचा दुकान तसेच ज्वेलर्समध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल झाल्याचे माहिती व्यापारी वर्गांनी दिली आहे. मंडप डेकोरेशन व वाजंत्रीसाठी ॲडव्हान्स देणे सुरू झाले, तर महागाईची मोठी झळ सध्या वधू-वर पालकांना सहन करावी लागत आहे. सर्व ठिकाणी महागाई वाढल्याने त्यात सोन्याचा भाव लाखांच्या आसपास गेल्याने लग्न समारंभासाठी वधू-वर मंडळींना मोठी कसरत करावी लागत आहे.

**वेचक**

## अर्जुन डोमाडे यांना कुंडल कृष्णाई पुरस्कार

**कल्याण :** सातारा येथील कुंडल कृष्णाई या "आम्ही पुस्तकांचे देणं लागतो" हे ब्रीद वाक्य घेऊन साहित्य विषयक कार्य करणाऱ्या संस्थेचे सन २०२५ चे कथा, कविता बाल साहित्य, प्रवास वर्णन इत्यादी साहित्य विभागाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले. त्यामधील कथा विभागातील कुंडल कृष्णाई हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङःमय पुरस्कार पोलिसातील कवी, कथाकार अर्जुन डोमाडे यांच्या डिंपल पब्लिकेशन प्रकाशित "भितूर" या कथासंग्रहाला जाहीर झाला. नुकत्याच सातारा येथे संपन्न झालेल्या कुंडल कृष्णाई प्रतिठानच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध साहित्यिक कादंबरीकार शरद तांदळे यांच्या हस्ते प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष हनुमंतराव जगदाळे व सचिव सावित्री जगदाळे यांच्या उपस्थित हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्जुन डोमाडे यांनी त्यांच्या पहिल्याच कथा संग्रहाला मिळालेला हा पहिलाच पुरस्कार "ज्याचे श्रेय त्याला द्यावे" या भावनेतून त्यांच्या मनात साहित्याचे बीज पेरणारे गुरुवर्य कै. अरुण मैड व या कथासंग्रहातील कथांचे कथाबीज पुरविणारे कथेचे ज्ञात, अज्ञात नायक व नायिका यांना अर्पण केला आहे. पुरस्कार मिळाल्या बद्दल अर्जुन डोमाडे यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

## ९४ निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान



**कल्याण :** सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांची शिकवणूक जीवनात उतरवत मानवीयतेचा आदर्श समोर ठेवत संत निरंकारी सत्संग भवन, गोल मैदान, उल्हासनगर येथे रविवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ९४ निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले, मुंबई मार्फत या शिबिरामध्ये रक्त संकलन करण्यात आले. संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या माध्यमातून आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरामध्ये संत निरंकारी मिशनच्या उल्हासनगर तसेच आजुबाजूच्या शाखांमधील ११७ भाविक भक्तगणांनी रक्तदानासाठी आपली नाव नोंदणी केली होती. यावरून त्यांच्या मानवसेवेच्या उदात्त भावनेची प्रचिती येते. मिशनचे स्थानिक सेक्टर संयोजक आणि सेवादल अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये निरंकार ईश्वराच्या प्रति प्रार्थना करत सतगुरुंच्या जयघोषाद्वारे या शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. हे रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी स्थानिक सेक्टर संयोजक किशन नेनवाणी आणि क्षेत्रीय संचालक जनार्दन म्हात्रे यांच्या देखरेखीखाली सेवादल स्वयंसेवक व संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## कल्याण-डोंबिवलीत कोंबिंग ऑपरेशन फत्ते

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवलीत गुरुवारी मध्यरात्री अचानक जिल्ह्याचे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दिलेल्या आदेशांनुसार परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या नेतृत्वाखाली मिशन कोंबिंग ऑपरेशन फत्ते करण्यात आले. कोंबिंग ऑपरेशन दरम्यान २५ गुंड-गुन्हेगार हाती लागले असून त्यांना तुरुंगाचा रस्ता दाखविण्यात आला. दोन तासांच्या ऑपरेशन दरम्यान कल्याण-डोंबिवलीच्या रस्त्यांवर लावलेल्या नाकाबंदीत २६६ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यातील ६६ बेशिस्त वाहन चालकांकडून ७९ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. धरपकड मोहिमेत पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, कल्याणचे सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, डोंबिवलीचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांच्यासह ४७ वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि २१० पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

## टिटवाळ्यातील बेकायदा भव्य होर्डिंग भुईसपाट

**कल्याण :** नागरिकांच्या जीविताला, सार्वजनिक मालमत्तेला धोका पोहचवेल अशाप्रकारचे टिटवाळा मांडा पश्चिम भागातील आझादनगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले एक भव्य धोकादायक होर्डिंग पालिकेच्या अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी बुडासकट कापून भुईसपाट करण्यात आले. टिटवाळा मांडा पश्चिममध्ये आझादनगर येथे कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता विभागाच्या परवानग्या न घेता काही मंडळींनी एकत्रित येऊन एक ३० बाय ४० फूट आकाराचे भव्य होर्डिंग सार्वजनिक रस्त्याच्या, पादचारी मार्गाच्या बाजुला उभारले होते. वादळ, वारा, पाऊस असला की या बेकायदा होर्डिंगवर लावण्यात आलेल्या पत्र्यांचा मोठ्याने आवाज परिसरात यायचा. वादळ वारा सुरू असेल तर पादचारी, वाहन चालकांना या भागातून जाताना होर्डिंग वाऱ्याच्या वेगाने तुटेल अशी भीती वाटायची. टिटवाळा भागातील अनेक नागरिकांनी या बेकायदा भव्य फलका विषयी पालिकेच्या अ प्रभागात तक्रारी केल्या होत्या.

## सिव्हिल रुग्णालयात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहात



◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

जगातील कोणतीही भव्य इमारत दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी तिचा पाया मजबूत असणे आवश्यक असते. याचप्रमाणे, आरोग्यसेवेच्या व्यवस्थेचा खरा कणा म्हणजे शुश्रुषा संवर्ग नर्सेस. रुग्णांच्या जीवनात जीवनदान देणाऱ्या या सेवाभावी घटकांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात हा दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी भूषविले. यावेळी २०२५ सालच्या जागतिक थीमचे अनावरण करण्यात आले "Our Nurses. Our Future. Caring for nurses strengthens economies". या थीमच्या अनुषंगाने डॉ. पवार यांनी उपस्थितांचे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी नर्सिंग कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करत, रुग्णसेवेतील त्यांच्या अतुलनीय भूमिकेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमात अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धिरज महंगाडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाली राहूड, तसेच मुख्य अधिसेविका प्रतिभा बर्डे यांचीही उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या अनुभवातून नर्सिंग कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या कामगिरीला दिलासा दिला. या विशेष दिवशी प्रतिभा बर्डे यांच्या पुढाकाराने दीपप्रज्वलन करून शुश्रुषा संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत उत्तम रुग्णसेवेची शपथ घेतली.

## ठाण्यात बांगलादेशी फेरीवाल्यांच्या संख्येत वाढ

### घुसखोरांवर कारवाईची शिवसंस्कृती प्रतिष्ठानची मागणी

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पुन्हा एकदा घुसखोरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बनावट आधारकार्ड व अन्य कागदपत्राचे पुरावे बनवून बांगलादेशी नागरिक ठाण्यात मोठ्या प्रमाणात वास्तव्य करत आहेत. याबाबत शिवसंस्कृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता घाडगे यांनी या घुसखोरांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी करत आमदार संजय केळकर आणि आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या जनता दरबारात लेखी निवेदन दिले. त्यावेळी दत्ता घाडगे, मेघनाथ घरत, प्रफुल वाघोले आणि ओमकार चव्हाण उपस्थित होते.



ठाणे शहरात घुसखोर बांगलादेशी फेरीवाल्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून अनेक बांधकामांच्या ठिकाणी सर्रास परप्रांतीय मजुरांचा राबता दिसून येत आहे. ठाणे शहरात त्यांच्या टोळ्या सक्रिय असून दर महिन्याला हजारो लोक शहरात घुसखोरी करीत आहेत. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा वास्तवाचा पुरावा नसताना सुद्धा बिनधास्तपणे शहरात अनेक ठिकाणी मासेविक्री, नारळपाणी विक्री, पंक्चरवाले, फळविक्री, अनेक प्रकारचे ज्यूस विक्री अनधिकृतपणे रस्त्याच्या बाजूला हातगाडी लावून करत आहेत.

या घुसखोरांमुळे सामाजिक सुरक्षा सुद्धा धोक्यात येत आहे. त्यामुळे अशा घुसखोर बांगलादेशींवर त्वरित कारवाई करावी. अन्यथा, नागरिकांना कायदा हातात घ्यावा लागेल, असा इशारा दत्ता घाडगे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. भारतात बांग्लादेशी नागरिकांची घुसखोरी वाढत आहे. सहज उपलब्ध होणार्या पॅनकार्ड व आधारकार्ड अशा बनावट कागदपत्रांच्या आधारे हे घुसखोर राजरोसपणे वावरत आहेत.

कोणत्याही पोलीस व्हेरीफिकेशनशिवाय ही मंडळी बेकायदेशीरपणे वास्तव्य करीत आहेत. काही महिन्यापूर्वी दत्ता घाडगे यांनी याबाबतच्या तक्रारी ठाण्यातील तसेच नवी मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांसह सरकार दरबारी केल्या होत्या, तर आता ठाणे महापालिका आयुक्तांनाही निवेदन सादर केले असून पाच दिवसांत कारवाई करण्याचा अल्टीमेटम प्रशासनाला दिला आहे.



**कळवा पूर्वेला कचऱ्याचे ढीग**

कळवा पूर्वेला शिवाजी नगर परिसरात कळवा प्रभाग समितीच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या नालेसफाई ठेकेदाराच्या कर्मचाऱ्याकडून रोजच्या रोज कचरा उचलला जात नसल्याने दुर्गंधीने नागरिकांचा जीव गुदमरला आहे. गेल्या २८ एप्रिलला नाल्यातून कचरा काढला आहे. आज पंधरा दिवस झाले कचरा तसाच आहे.

(छाया : अशोकघाग)

## पालघरमधील शिक्षकांचा ठाण्यात येण्याचा मार्ग मोकळा

◆ **मुरबाड (प्रतिनिधी):**

ठाणे जिल्ह्याच्या विभाजनानंतर पालघर जिल्ह्यात ठाणे जिल्ह्यातील ३०९ शिक्षक पालघर जिल्ह्यात तात्पुरत्या स्वरूपात वर्ग केले होते. एका वर्षात भरती करून या शिक्षकांना मूळ जिल्ह्यात पुन्हा वर्ग करावे असे आदेश होते; परंतु गेली ८ वर्षे सदरचे शिक्षक पालघर जिल्ह्यात अडकून पडले होते. अखेर शिक्षकांच्या विकल्प विपरीत संघर्ष समिती ने उच्च न्यायालयात धाव घेऊन पालघर जिल्हा परिषदेस आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने या शिक्षकांना परत ठाणे जिल्ह्यात पाठविणे या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील तब्बल तिनशे नऊ शिक्षकांना नवनिर्मीत पालघर जिल्ह्यात तात्पुरत्या स्वरूपात वर्ग केले होते. पालघर जिल्ह्यात एक वर्षाच्या आत नवीन शिक्षक भरती करून या ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांना परत आपल्या जिल्ह्यात वर्ग करणे क्रमप्राप्त होते. परंतु प्रशासनाच्या उदासिनतेमुळे हे शिक्षक तब्बल आठ वर्ष पालघर जिल्ह्यातच आपली सेवा इमानेइतबारे बजावत होते. शिक्षकांच्या बदल्या पालघर जिल्ह्यात मात्र कुटुंब ठाणे जिल्ह्यात. यामुळे अनेक समस्यांना या शिक्षकांना तोंड द्यावे लागत होते. काहींच्या पत्नी या ठाणे जिल्ह्यात सर्व्हिस करत असल्याने त्या पालघर जिल्ह्यात जावू शकत नव्हत्या. मुलंही आईबरोबरच राहत असल्याने त्यांच्या शिक्षण व पालनपोषणावरही विपरीत परिणाम होत होता. अखेर



या शिक्षकांनी विकल्प वितरीत संघर्ष समिती स्थापन केली. आणि आपली याचिका उच्च न्यायालयात दाखल केली. विकल्प विपरीत संघर्ष समितीच्या वकील ॲड. प्रीती वाळिंबे यांनी ५ मे रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान जोरदार युक्तिवाद करत विकल्प विपरीत शिक्षकांची बाजू मांडली. उच्च न्यायालयातील न्या. रवींद्र घुगे व न्या. अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने विकल्प विपरीत शिक्षकांना कार्यमुक्त करण्यासंदर्भात आदेश दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विकल्प विपरीत शिक्षकांना १०जून पूर्वी पालघर जिल्हा परिषदेने कार्यमुक्त करणे आवश्यक आहे जेणे करून विकल्प विपरीत शिक्षक पुढील शैक्षणिक वर्ष ठाणे जिल्ह्यात सुरुवात करतील. या निर्णयामुळे या शिक्षकांसह त्यांचे कुटुंबीय यांनी आनंद साजरा केला आहे.

"न्यायालयाच्या आदेशाने विकल्प विपरीत शिक्षकांना न्याय मिळाला असून पुढील शैक्षणिक वर्ष मूळ जिल्ह्यात सुरू करतील. न्यायालयाच्या या निर्णयामुळे शिक्षक वर्ग आनंदात असून उच्च न्यायालयाच्या निर्णयाने सर्व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे."
-**अशोक कामडी,** कोषाध्यक्ष, विकल्प विपरीत शिक्षक संघर्ष समिती

## मदरसाच्या अनधिकृत वाढीव बांधकामावर केडीएमसीचा हातोडा

◆ **कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण पश्चिमेकडील रहेजा परिसरात सत्यम इमारतीमध्ये मदरशामध्ये अनधिकृत वाढीव बांधकाम झाल्याची तक्रार एका महिला डॉक्टरने केली होती. या तक्रारीची दखल घेत रविवारी केडीएमसीने पोलीस बंदोबस्तात मदरसाच्या अनधिकृत वाढीव बांधकामावर हातोडा चालवत जमीनदोस्त केले.

कल्याण रहेजा कॉम्प्लेक्समध्ये मदरसामध्ये अनधिकृत बांधकाम करण्यात आले होते. एका रहिवासी इमारतीच्या तळमजल्यावर मदरसाचे वाढीव अनधिकृत बाधंकाम



इमारतीच्या मूळ बांधकामात बदल करून वाढीव अनाधिकृत बांधकाम करण्यात आले होते. कल्याण डोंबिवली महापालिकेकडे या संदर्भात तक्रार प्राप्त झाली होती. तक्रारीनंतर, सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांच्या पथकाने कारवाई चा बडगा उगारित मदरसाचे अनाधिकृत वाढीव बांधकामावर तोडक कारवाई केली.

**सर्व यंत्रणांनी या मॉक ड्रिलला गांभीर्याने घ्यावे, तहसीलदारांचे आवाहन**

# नवी मुंबईतील 'वाशी-सेक्टर १२'मध्ये 'ऑपरेशन अभ्यास' मॉक ड्रिल

◆ **नवी मुंबई (वार्ताहर):**

केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्जता तपासण्यासाठी "ऑपरेशन अभ्यास" या मॉक ड्रिलचे आयोजन ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई येथील नीलसिद्धी टॉवर, ए आणि बी विंग, एनएमएमटी टर्मिनस जवळ, प्लॉट नं. ९५, सेक्टर १२, वाशी, नवी मुंबई येथे आज, मंगळवा (दि.१३)दुपारी ४.०० वा. करण्यात आले आहे.

हे मॉक ड्रिल ठाणे जिल्हाधिकारी तथा नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे, नवी मुंबई



महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, प्रांताधिकारी उर्मिला पाटील व शहर अभियंता तथा मुख्य अग्निशमन अधिकारी शिरीष आरदवाड,नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार उमेश पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणार आहे. सर्व यंत्रणांनी या मॉक ड्रिलला गांभीर्याने घ्यावे. केंद्रीय गृह विभागाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून यशस्वीरित्या ही मॉक ड्रिल पार पाडावी.

मॉक ड्रिलच्या दरम्यान सूचना मिळाल्यानंतर दुपारी ४.०० वाजता सायरन वाजवून नागरिकांना धोक्याचा इशारा दिला जाईल. या दरम्यान नागरिकांनी घाबरू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, सेल्फी काढू नये आणि प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करावे, हे मॉक ड्रिल केवळ पूर्वतयारीचा भाग असून कोणतीही खरी आपत्ती उद्भवलेली नाही, हे लक्षात घ्यावे, असे आवाहन तहसिलदार उमेश पाटील यांनी केले आहे.

**मॉक ड्रिलमध्ये होणारा घटनाक्रम**


सायरन वाजणार, बॉम्ब हल्ल्याची सूचना मिळणार, सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठीच्या सूचना दिल्या जाणार, नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविले जाईल. शोध मोहीम घेऊन अडकलेल्या नागरिकांची सुटका करणे, त्यांना प्रथमोपचार करणे ही कार्यवाही करण्यात येईल.

## रस्त्यावरील वाहनांचे अज्ञात वाहनधारकांकडून नुकसान

### सीसी कॅमेऱ्यात दुचाकीस्वार कैद

◆ **कल्याण(प्रतिनिधी):**

डोंबिवली एमआयडीसी निवासी, मिलापनगरमधील सर्व्हिस रस्त्यावर गटाराच्या कामामुळे तेथील रहिवाशांना आपली वाहने घरासमोर रस्त्यावर उभी करून ठेवावी लागत आहेत. या अरुंद रस्त्यावर प्रचंड वर्दळ असते, कारण कल्याण शिळ रस्त्यावर होत असलेल्या मेट्रोच्या कामामुळे ट्रॅफिक झाल्याने काही वाहनधारक या सर्व्हिस रस्त्याने वाहतुक वळवतात. गेले काही दिवस येथील पार्क केलेल्या वाहनांना अरुंद रस्त्यामुळे अज्ञात वाहनांकडून ठोकर मारली जात असल्याने आतापर्यंत अनेक वाहनधारकांचे नुकसान होत आहे. याबाबत येथील रहिवासी वैभव पोद्दार यानी मानपाडा पोलीस



ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसानी या रस्त्यावरील लावलेले सीसी कॅमेरे तपासून संबंधीत वाहनधारकांवर कार्यवाही करावी अशी मागणी येथील रहिवाशांकडून होत आहे. पोलिसांनी सीसी कॅमेरे तपासले असता दि.५ मे २०२५ रोजी पहाटे तीन वाजता एक दुचाकीस्वार कारला धडकून जखमी झाल्याचे पाहण्यास मिळाले आहे. एमआयडीसी ठेकेदाराकडून होत असलेले नवीन गटारांचे काम हे पुष्कळ दिवसांपासून रेंगाळलेले असून ते लवकरात लवकर पूर्ण केल्यास आणि या रस्त्यावरून बस/ट्रक अशा वाहनांना वाहतुकीसाठी बंद केल्यास सदर प्रश्न सुटू शकतो. शिवाय यामुळे या रस्त्यावर भविष्यात होणारे अपघात होणार नाहीत अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.

# कळा ज्या लागल्या जीवा...

देशाच्या बहुतेक भागांत आता सरासरीपेक्षा वर जास्त तापमानाची नोंद होत आहे. सामान्य परिभाषेत त्याला उष्णतेची लाट म्हणतात. या मे महिन्यात या उष्णतेच्या लाटेत सामान्य जनजीवन होरपळून निघणार तर आहेच पण पशुपक्षी, वन्य प्राणी आणि कीडे कीटक यांनाही तीव्र उन्हाच्या झळा बसणार आहेत. दरवर्षीच हे होत असते आणि याला नॅचरल फिनॉमिनॉ म्हणतात. पण उत्तर भारत आणि महाराष्ट्राच्या काही भागांत जसे की, मराठवाड्यातील जिल्हे तसेच जळगाव आणि धुळे आदी भागात या दिवसात तीव्र उन्हाने तापनमानाचा पारा कितीतरी जास्त चढलेला असतो. भारतीय हवामान विभागाने जी महिती दिली आहे त्यानुसार हीट वेव्हज् या महिन्यात राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि गुजरात तसेच ओडिशाच्या भागात तसेच उत्तर कर्नाटक या प्रांतात या हीट वेव्हचा अनुभव येईल. आता या उष्णतेच्य लाटेचे कारण सांगता येईल की ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामानातील बदल हेच आहेत.

वाढते जागतिक तापमान आणि ग्रीन हाऊस गॅसेस परिणाम यामुळे वारंवार उष्णतेच्या लाटा येतात. तसेच जी शहरे अधिक दाट वस्तीतील आहेत त्यांना हीट वेव्हचा सामना करावा लागतो असेही कारण सांगितले जाते. या सर्व कारणामुळे मुंबई आणि इतरत्र भारतात हीट वेव्हचा परिणाम जाणवतो असे दिसते. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, २०२५ हे वर्षे सर्वात हॉट वर्षे असेल असा अंदाज आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या आकडेवारीत म्हटले आहे की, २०२४ या वर्षी जितके तापमान होते त्यापेक्षा अधिक तापमान यंदा मार्च ते मे महिन्यात भारतात कित्येक ठिकाणी जाणवेल. उन्हाळा सुरू होताच अनेक ठिकाणी तापमान सरासरीपेक्षा वर गेलेले दिसते. त्यामुळे त्याचा आपल्या शरीरावर घातक परिणाम होतो. कमाल तापमानातील वाढ ही सरासरी ६.५ पेक्षा जास्त नोंदवली जाते तिला त्याला उष्णतेची लाट आल्याचे मानले जाते. महाराष्ट्रात तर असा काळ आता येत आहे आणि त्याला आपण सर्वांनी ठामपणे सामोरे जायला हवे. जळगाव आणि अन्य जिल्ह्यात, तर उष्म्यामुळे उन्हाचा तडाखा ज्याला सनस्ट्रोक म्हटले जाते त्याचा धोका फार मोठा असतो आणि त्या घटना अटळ आहेत. पण त्यावर उपाय आहेत ते म्हणजे सतत शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम ठेवणे, उन्हाच्या तडाख्यात बाहेर न पडणे असे कित्येक उपाय आहेत.

भारतातील पीकपाणी स्थितीवर उष्णतेच्या लाटेचा परिणाम होत आहे. गहू आणि तांदूळ तसेच इतर पिकांवर लक्षणीय परिणाम होतो आणि त्याचा परिणाम पिकाचे उत्पादन कमी होण्यावर होतो. पिकाची गुणवत्ता आणि प्रमाण कमी होते तसेच फळे, भाज्या आणि पशुधनावर उष्णतेच्या लाटेचा परिणाम होतोच. यंदा उच्च तापमानामुळे दुभत्या जनावरांची काळजी जास्त घ्यावी लागेल. त्यांची तहान भूक कमी होते आणि कित्येक तर जीव सोडतात. भारतात उष्णतेचा ताण आणि अनियमित हवामान यामुळे कृषी उत्पादनात लक्षणीय घट होते आणि भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा घातक परिणाम होत असतो. हाच काळ असतो की जो गहू हंगामाचा असतो. भारतातील हवामान बदलामुळे भारताच्या गव्हाच्या उत्पादनावर गव्हाच्या उत्पादनाचा दर्जा आणि उत्पादनावर व्यापक परिणाम होतो. भारताने यंदाच्या फेब्रुवारीत सर्वाधिक उष्ण महिन्याची नोंद केली आहे. १२५ वर्षांतील हे रेकॉर्ड आहे. हवामान विभागाने मे महिन्यात धोक्याची घंटा वाजवली आहे की, यंदाचा मे महिना हा सर्वाधिक उष्ण महिना असेल. केवळ तापमान वाढ इतक्यापुरताच हा परिमाम नाही, तर एल निनोचा परिणाम भारताच्या कृषी उत्पादनावर होत असतो आणि त्यामुळे हीट वेव्हची दखल घ्यावी लागते. गहू हे भारतातील प्रमुख पीक आहे आणि गेल्या दोन ते तीन वर्षांपासून गव्हाने उत्पादनाचा उच्चांक गाठला आहे. यंदा पंजाब, हरियाणा, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार आणि उत्तर प्रदेश या राज्यात सरासरीपेक्षा वर तापमान नोंदवले गेल्याने कृषी उत्पादनावरही त्याचा परिणाम होणार आहे. केवळ उन्हाचा तडाखा इतक्यापुरता हा परिणाम मर्यादित नाही तर भारताचे कृषी उत्पादन यावर एल निनोचा परिणाम होणार आहे. परिणामी भारताच्या जीडीपीवर त्याचा परिणाम होणार आहे. गहू हे भारताचे मुख्य पीक आहे. यंदा भारताने ११२.२ दशलक्ष अब्ज टन गहू उत्पादन २०२२ मध्ये नोदवले आहे.

कृषीमध्ये महत्त्वपूर्ण लोकसंख्येचा भाग हा गुंतलेला असतो. त्यामुळे उष्णतेची लाट आणि त्याचा पिकावर परिणाम याचा किती गहिरा परिणाम होणार आहे याचा अंदाज येईल. भारतीय हवामान खात्याने असेही म्हटले आहे की, हीट वेव्हमुळे गव्हाच्या उत्पादनावर परिणाम तितकासा होणार नाही. पण फळभाज्या लागवडीवर त्याचा परिणाम होईल. उष्णतेच्या लाटेचा परिणाम मनुष्याच्या आरोग्यावर ही होतो आणि हार्टस्ट्रोक्स आणि डिहायड्रेशनचा धोका असतो. तसेच रोगराई जसे की संसर्गजन्य रोगांचे प्रमाणही वाढते. त्यामुळे मानवाने सर्वंकष काळजी घेतली पाहिजे हे त्यावर उत्तर आहे. पाण्याचा पुरवठा, तर ग्रस्त होतोच आणि उन्हाळ्यातच टँकर मुक्त महाराष्ट्राच्या नुसत्या घोषणा झाल्या. पण त्यावर अंमलबजावणी झालीच नाही. टँकर आजही आहेत आणि टँकर लॉबीचे राज्य आहे. उन्हाच्या लाटेत तर टँकर लॉबीवर तर कित्येकांचे साम्राज्य उभे राहिले आहे. त्याला कुणीही धक्का लावू शकलेले नाही. पण उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक परिणाम होतो. तो उत्पादनावर आणि घटलेली व्यावसायिकता यामुळे लोकांचे उत्पन्न कमी होते. हा परिणाम फार मोठा होतो. मुंबईच नव्हे तर अर्धा भारत आज हीट वेव्हच्या तडाख्यात आहे. येत्या काही दिवसांत तो परिणाम वाढत जाणार आहे. त्यामुळे भारतीयांनी दक्ष राहिले पाहिजे आणि सरकार तसेच नागरिकांनीही आपल्याला उष्णतेपासून त्रास होऊ नये यासाठी काळजी घेतली पाहिजे.

# सायबर संस्कार ही एक आवश्यक गरज




**डॉ. दीपक शिकारपूर**

एव्हाना आपण सर्वांनीच सायबर जगतात आणि त्या निमित्ताने एका नव्या विश्वात प्रवेश केला आहे. या जगतात आपल्याला अनुकूल आणि जगणे सूखकर करणारी अनेक तंत्रे समाविष्ट आहेत. गेल्या दशकातील तंत्रज्ञान विकास व अंमलबजावणीच्या वेगापेक्षा पुढील दशकातील वेग अधिक दखलपात्र असेल. सर्वांना, विशेषतः एकविसाव्या शतकात जन्माला आलेल्या पिढीला इथे वावरताना जास्त सतर्क व जागरूक राहावे लागेल.

मनन करून, सर्वांगीण विचार करून कृती करतो तो मनुष्य. चांगला विचार आणि कृती होण्यासाठी संस्कारांची गरज असते. आजचे युग पूर्णपणे डिजिटल झालेय. एकविसाव्या शतकात संगणक आणि मोबाइल क्रांतीने जीवनपद्धतीचे सर्व संदर्भ बदलेले आहेत. आज प्रौढ वयात संगणक अथवा इंटरनेटशी संबंध आलेली पिढी आणि जन्मापासून संगणकीय युगातच वावरणारी म्हणजे साधारण २०००नंतर जन्मलेली मुले-मुली यांच्या इंटरनेटकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात मूलभूत फरक असणार आहेच. इंटरनेट वापराच्या ३० टक्के एवढा वेळ सोशल नेटवर्किंग आणि ब्लॉग्जसाठी खर्च केला जातो, जो ई-मेलपेक्षा ही जास्त आहे. गेल्या काही वर्षांमध्ये लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साइट वापरकर्त्यांच्या प्रमाणात जगभर लक्षणीय वाढ होत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. अनेकदा वेळ नसल्याने पालक आणि पाल्यांचा संवाद कमी होत आहे. त्यामुळे संगणक, मोबाइल, टीव्ही ही उपकरणे मुलांच्या संवादाची साधने बनली आहेत. ८-१४ वयोगटातील बरेच विद्यार्थी याच्या आहारी जाऊन तेच आपले विश्व असल्याच्या भ्रमात वावरतात. त्यामुळे नैराश्य, दुभंगलेले व्यक्तिमत्त्व आदी समस्यांमुळे काहीजण आत्महत्येचा मार्गही स्वीकारत आहेत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक वस्तू, उपकरण हे 'स्मार्ट' असणे ही आज चैन नसून गरज बनत चालली आहे. सतत इंटरनेटचा वापर हे सुद्धा एक व्यसनच बनत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. शेवटी आपण लक्षात घेतले पाहिजे की तंत्रज्ञान हे सुऱ्यासारखे असते. एखादे फळ कापण्यासाठी किंवा एखाद्याची हत्या करण्यासाठीही ते वापरले जाऊ शकते. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात, तसेच अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लोक तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्या संकेतस्थळांची सफर करताना सावधपणा अंगी बाळगणे जरूरीचे असते. आजच्या काळात पालकांनी आपल्या पाल्यांना स्मार्टफोन द्यायच्या आधी तो कसा वापरावा याचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक आहे. तंत्राला वापरणारे मन, विचार हे त्याचा वापर ठरवते. अमेरिकेत अनेक वेळा शाळकरी मुलांवर खुनी हल्ले झालेत. ते आत्तापर्यंत कुठल्या तरी हाडामासाच्या विकृत खूनही व्यक्तीने केलेत. पण भविष्यात कदाचित स्वयंचलित वाहन किंवा यंत्रमानव असे गुन्हे करू शकेल. त्यावेळी हत्या करणारा कोण हे ठरवणे अवघड असेल. माहिती-तंत्रज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीने सारे जग जोडण्याची किमया केली खरी; परंतु त्याबरोबरच विघातक, विध्वंसक वृत्तींनाही कमी जोखीम पत्करून जास्त दुष्परिणाम घडवण्याची क्षमताही प्राप्त झाली. सायबर तंत्रज्ञानाद्वारे चालवली जाणारी अशी युद्धे आत्तापर्यंतच्या लढायांपेक्षा फार वेगळी असणार आहेत. कोणतीही प्रत्यक्ष सीमारेषा नसलेली आणि फार वेगाने पसरणारी. यापुढे शाळा, महाविद्यालयांमध्येही संगणक किंवा स्मार्टफोनच्या दुष्परिणामांवर प्रबोधन होणे बंधनकारक व्हायला हवे. नागरिकशास्त्र या विषयातही याचा समावेश करायची हीच वेळ आहे. आधुनिक तंत्रज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे सायबर संस्कार. सायबर संस्कार प्रशिक्षणात स्मार्टफोनचा वापर नेमका कसा करावा, सोशल मीडियावर माहिती पोस्ट करताना कोणती काळजी घ्यावी, सेल्फीचे व्यसन मर्यादेत असावे; किंबहुना ते व्यसन बनूच नये, योग्य पद्धतीने चलतचित्रण करणे, सायबर गुन्हेगारी, स्वतःला सायबर सुरक्षित कसे ठेवायचे, सायबर कायदे कसे पाळायचे आणि सायबर गुन्हेगारी करणाऱ्यांना झालेल्या शिक्षा या महत्त्वाच्या बाबींची माहिती द्यायला हवी. हे प्रशिक्षण गांभीर्याने द्यायला, घ्यायला हवे. तरच त्याची परिणामकारकता जाणवेल आणि उपयुक्तता सिद्ध होईल. पूर्वी फक्त भौतिक गोष्टींची सुरक्षा गणली जायची. आता सायबर सुरक्षा आणि सर्व संगणकीय भांडवलाची आणि माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब झाली आहे. कुंपण, पहारेकरी, कड्या-कुलूप, तिजोरी, शिस्त हे सर्व पर्याय पारंपारिक भौतिक जगातील व्यवसायांसाठी ठीक आहेत, पण डिजिटल युगात ते कुचकामी ठरतात. त्यासाठी वेगळे सायबर नियम अत्यावश्यक आहेत.

आगामी काही वर्षांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, विश्लेषण, यंत्रमानव (रोबोटिक्स), इंटरनेट ऑफ थिंग्स यासारख्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळात जगाच्या भल्यासाठी अनेक क्रांतिकारी शोध लागतील. या संशोधनाचा वापर करून नवीन उत्पादने बनू शकतील आणि बनतीलही. पण हेच सर्व तांत्रिक प्रवाह एखाद्या विकृत, गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्तीच्या हाती पडल्यास नाशही होऊ शकतो. यामुळेच एमआयटी, स्टॅनफर्ड, हार्वर्डसारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये संगणक तंत्रज्ञांना आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नैतिकता, नीतिमूल्य या मूलभूत विषयांवर सक्तीचा अभ्यासक्रम विकसित होत आहे. त्यामुळे काय बरोबर आहे व काय चूक आहे हे समजून घेणे कसे गरजेचे आहे, नव्या पिढीला, तंत्रज्ञांना कळेल आणि या बाबी ते आचरणात व्यवहारात आणतील, असा त्यांचा होरा आहे. हा प्रवा काही वर्षांमध्येच भारतीय शिक्षणपद्धतीमध्येही अंतर्भू होईल. अस्तित्वात असलेल्या मानवी नातेसंबंधांचा दज आणि खुमारी वाढवण्यासाठी तंत्रज्ञान वापरा, पण सोशल नेटवर्किंग साइटवर जाऊन मित्र-मैत्रिणी शोधू नका, अश ई-नातेसंबंधांचे मानवी व्यक्ती ऋणानुबंधात फार क्वचि रुपांतर होते, हे आता समजून घ्यावे आणि प्रसंगी समजावू सांगावे लागेल. त्यातून अनेकदा गुन्हेगारीचे प्रकार घडतात सर्वच इंटरनेट वापरकर्ते सभ्य आणि सुसंस्कृत असतील असे नाही. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात त अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लो तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याच प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्य संकेतस्थळांची सफर करताना अंगी सावधपणा बाळग जरूरीचे असते.

कुठलीही गोष्ट मर्यादित प्रमाणात मूल्य देते. तंत्रज्ञानाचे असेच आहे. गरज असेल तरच मुलांनी ते वापरावे. वेळ जा नसेल तर मैदानी खेळ, कला, बाह्य क्रिया, योगा, फिरण संगीत असे अनेक पर्याय आहेत. इंटरनेट न वापरायची सवय झाली पाहिजे. माझा एक मित्र रविवारी इंटरने अजिबात वापरत नाही. या बाबतीतही स्वतःवर बंध आणि शिस्त आवश्यक आहे. अनेकजण स्वतःवर ते घालू घेतात तर अनेकजण मुळातच संतुलन राखून सोशिय मीडिया, इंटरनेटचा वापर करतात. या ठिकाणी हे लक्षा घेणे आवश्यक आहे की, माफक प्रमाणात आणि हवे असे तेव्हाच आपण हे तंत्रज्ञान वापरले तर त्याचे अनेक फाय आहेत, मात्र अनाठायी, उठता-बसता सायबरजगता रमायची सवय लागली, तर नजिकच्या काळातच या सवयी रुपांतर व्यसनामध्ये होऊ शकते आणि पाहता पाहता मुले य तंत्राच्या आहारी जाऊ शकतात. सायबरचोरीचे, या तंत्रामु निर्माण होणाऱ्या गुंत्याचे तोटे समजून घेतले आणि समजावू दिले, तर भविष्यात या विश्वात वावरणे सोयीचे होईल अन्यथा त्याचा बाऊ करणे किंवा त्यापासून दूर राहण्याच मार्ग अनेकजण स्वीकारताना दिसतील.

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरत प्रसारक आहेत.**

# जगाची आर्थिक कोंडी

**चंद्रशेखर टिळक**
**प्रख्यात अभ्यासक**

सध्या जागतिक बाजारपेठेवर अधिराज्य गाजवण्याची अहमाअहमिका लागली असून सर्व देश एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत आहेत. काश्मीरमधील ताज्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील नगण्य व्यापार जवळपास टप्प झाल्याची स्थिती आहे. आज जगातील अनेक भागांमध्ये युद्धजन्य स्थिती आहे. या सगळ्यात आर्थिक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे हे नाकारण्यात अर्थ नाही.

सध्याच्या वैज्ञानिक, आधुनिक युगात साडेसाती, पत्रिका, नशीब, भविष्य, ज्योतिष यावर विश्वास ठेवायचा की नाही हा वैयक्तिक प्रश्न आहे. तो अंधश्रद्धा की श्रद्धेचा भाग, हा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. पण निव्वळ भावार्थाने, लक्षार्थाने, शब्दार्थाने म्हणायचे झाल्यास सध्याच्या जागतिक अर्थकारणाला साडेसाती लागली आहे का, हा प्रश्न पडतो. तसे पाहायला गेले, तर अर्थशास्त्र आणि नशीब या दोन गोष्टींचा संबंध नसतो. पण अर्थकारण चांगले असते, त्याचे नशीबही चांगले असते असे मानले जाते आणि नशीब चांगले असते त्याचे अर्थकारण सुदृढ असते असेही मानले जाते. पण सध्या तरी जागतिक अर्थकारणाच्या नकाशावर वा पटलावर लक्ष दिले, तर लक्षात येणारी गोष्ट म्हणजे प्रत्येक देशाबाबत या ना त्या स्वरुपात जागतिक अर्थकारणाच्या दृष्टिकोनातून अडचणी निर्माण झाल्या आहेत. अगदी आपल्या देशापुरता विचार करायचा झाला तरी काही बाबींकडे निश्चितच अधिक लक्ष द्यावे लागेल.

ताजे उदाहरण घ्यायचे तर, २२ एप्रिल २०२५ ही तारीख भारताच्या इतिहासात कशी नोंदवली जाईल, हे काळच दाखवून देईल. या दिवशी पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला आणि २६ जणांची निर्घृण हत्या करण्यात आली. याच दिवशी भारताच्या अंतर्गत बाजारामध्ये सोन्याचे भाव एक लाखांपलीकडे गेले. सकृतदर्शनी या दोन घटना एकमेकांशी संबंधित दिसत नाहीत. पण एखाद्या दिवसाची तात्कालिकता सोडली तर लक्षात येणारी गोष्ट म्हणजे गेल्या काही वर्षांचा जागतिक इतिहास सांगतो की, या ना त्या स्वरुपाची जागतिक, राजकीय, सामाजिक, भौगोलिक, स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक स्थिती अस्थिर वा अनिश्चित होत जाते त्यावेळी सोन्याचे भाव वरच्या पातळीवर जातात. वाचकांना आठवत असेल की, कोरोनानंतरच्या काळामध्ये सोन्याच्या भावाने अशीच उसळी घेतली होती. यामध्ये सोन्याचे बहुमूल्यत्व फार मोठ्या प्रमाणावर लगेचच वाढते अशातला भाग नाही. पण इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसतो तेव्हा सोनेखरेदीकडील कल वाढतो, हा आजपर्यंतचा इतिहास आहे. अशा वेळी सोन्याचे भाव वाढणे हे आर्थिक कोंडीचे एक कारण असते की परिणाच असतो, हा प्रश्न उभा ठाकल्याशिवाय राहत नाही. ही आर्थिक कोंडी शब्दप्रयोगाच्या आनुषंगाने 'आर्थिक' असली तरी नानाविध कारणांनी ती वाढत असते. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर, २२ एप्रिलला पहलगाममधील घटनेनंतर सहज, स्वाभाविक आणि नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणून केंद्र सरकारने काही कडक पावले उचलली आहेत. मुळातच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापार नगण्य होता. आता तर तो शून्यावर येऊन थांबला आहे. राजनैतिक संबंधांमध्येही दूतावासातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्यापासून आपले हवाई क्षेत्र एकमेकांना वापरण्यावर बंदी घालण्यापर्यंत आणि यापुढे भारतीय नद्यांचे पाणी पाकिस्तानला देणार नाही, असा निश्चय करण्यापर्यंत ठाम भूमिका जाहीर करण्यात आली आहे. या प्रकरणामध्ये चीनची मूक संमती वगळता पाकिस्तानच्या बाजूने अन्य कोणीही उभे राहिलेले नाही. स्वाभाविकच यातून भारत आणि पाकिस्तानमधील आर्थिक कोंडी वाढेल, अशातला भाग नाही.



याखेरीज सध्या जगाच्या पटलावर असे हे एकमेव उदाहरण आहे, अशातील भागही नाही. कारण त्याच दुर्दैवी आठवड्यामध्ये युक्रेनच्या अध्यक्षांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली होती. झेलेन्स्की यांनी काहीच दिवसांपूर्वी अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांचीही भेट घेतली होती. अमेरिकेचे हेच मोठे नेते दहशतवादी हल्ला झाल्याच्या दिवशी भारतात होते. युक्रेनच्या अध्यक्षांचे आणि अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींच्या भेटीचे परिणाम वा ही भेट अत्यंत वाईट असल्याचे जगाने पाहिले आहे. पण काही दिवसांनंतर झेलेन्स्की यांनी अमेरिकेच्या राष्ट्रप्रमुखांची भेट घ्यावी आणि ट्रम्प यांनी ही भेट समाधानकारक झाल्याचे सांगावे ही बाब नोंद घेण्याजोगी आहे. मात्र या भेटीनंतर ट्रम्प यांनी रशियाला सध्या युक्रेनशी असणारे युद्ध थांबवण्यात स्वारस्य नसल्याचेही स्पष्ट केले होते. ही पुढील घटनांची चाहुल आहे का, यावर विचार करावा लागेल.

चीन आणि भारत यांचे संबंध 'तुझे माझे जमेना आणि तुझ्यावाचून सरेना' असे राजनैतिक स्वरुपाचेच असतात अशातील भाग नाही. 'पहलगामकी क्या पहचान, चीन और पाकिस्तान' असा विचार मांडणारी मंडळी आजही आपल्याकडे आणि जगभर कार्यरत आहेत हे इथे लक्षात घेण्याजोगे आहे. अशा परिस्थितीत चीन, रशिया आणि अमेरिका यांचे जागतिक व्यापारावर आपले वर्चस्व गाजवण्याचे प्रयत्न नक्कीच सुरू झाले आहेत. यातूनच येणाऱ्या काळामध्ये अस्तित्वात असणारे कडवट संबंध पराकोटीला जातील का, हा प्रश्न पडतो. युरोपीय देशांची परिस्थिती (जर्मनीचा अपवाद वगळता) काही प्रमाणात तरी नकारात्मक आहे. त्यामुळे भारतासारखी सर्वात मोठी अर्थव्यवस्था, त्याच्या लोकसंख्येचा आकार, भौगोलिक आकार आणि बाजारपेठेचा आकार या सगळ्या निकषांचा विचार करता त्याची स्थिती बेताची असणे किंवा आपला देश युद्धग्रस्त असणे ही बाब जागतिक अर्थकारणातील मोठी अडचण ठरू शकते. यातून भारताची स्वतःची आर्थिक कोंडी होऊ शकते तसेच भारताच्या व्यापारक्षमतेवर तात्कालिक स्वरुपाचा परिणाम झाल्यामुळे जागतिक व्यापाराचा वेग, प्रभाव, प्रचार, प्रसार, त्वरण आणि वस्तुमान हे सर्व कमी होऊ शकते. त्यामुळे भारत हे आर्थिक कोंडीचे कारण असेल की आर्थिक कोंडीचा परिणाम असेल याचाही विचार करावा लागेल.

एकंदरीतच, अर्थकारणाची नदी वेगवान असेल तितके जागतिक सामंजस्य वेगवान राहते असा समज आहे. तलवारीच्या टोकावर व्यापार करण्याचा काळ आता इतिहासजमा झाला असला तरी व्यापारी जमेचा इतिहास नेहमी सामर्थ्यावर चालतो ही वस्तुस्थिती आहे. असा विचार करताना एकदंरित कोरोनानंतरच्या काळात निर्माण झालेल्या संधी, दोष, परिणाम आणि कारणे गेल्या काही आठवड्यात एका सर्वोच्च पातळीवर आल्या आहेत. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून कोणत्याही राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत गुंतवणूकयोग्य रकमेचे वाढीव प्रमाण (इन्वेस्टेबल सरप्लस) सोन्याच्या खरेदीकडे वळते का, हे पाहावे लागेल.

जगाच्या नकाशावर नजर टाकली तर सध्या किमान पाच ते सात ठिकाणी युद्धसदृश परिस्थिती आहे. कॅनडा आणि अमेरिकेतील संबंध, जानेवारी २०२५ मध्ये अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कारभार स्वीकारल्यावर काही देशांबाबत टॅरिफची केलेली घोषणा, टप्प्याटप्प्याने होणारी त्याची अंमलबजावणी, काही बाबतीतील घुमजाव यातून आज पूर्णपणे नाकेबंदी झाली नसली तरी मनामध्ये आणि जनामध्ये एक प्रकारची अस्थिरता निर्माण झाली आहे. आज आंतराष्ट्रीय अर्थकारणात अमेरिका ही एकमेव महासत्ता आहे. हा देश एकाच वेळी उत्पादक आहे आणि उपभोक्ताही आहे. तेलबाजारात अमेरिकेबाबत म्हटले जाते की, तो स्वतःच्या देशात उत्पादित होणारे तेल सरप्लस म्हणून बाजूला ठेवतो आणि आंतरराष्ट्रीय तेल व्यापारातून दैनंदिन उपभोग पूर्ण करतो. त्यामुळेच आता अमेरिकी वा जागतिक तेल बाजारामध्ये पेट्रो डॉलर ही संज्ञा कार्यरत झाली नसली तरी अमेरिकेने वेगवेगळ्या देशांबाबत तेलासहित तंत्रज्ञानामध्ये केलेली गुंतवणूक हा ही एक वेगळ्या अभ्यासाचा मुद्दा म्हणावा लागेल. अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा अनेक देशांच्या अर्थकारणाच्या नाड्या काही मोजक्या देशांच्या हातात राहतात. अशा वेळी या मोजक्या देशांनी आक्रमक भूमिका घ्यावी हे सोयीस्कर विधान असते. पण ते कृतीत येणे, असणे आणि राहणे ही सदैव चालणारी प्रक्रिया नसते. निदान सध्याच्या काळात तरी ती नाही. थोडक्यात, अनेक राष्ट्रांच्या मनात असणारी आशंका, आरोप यातून जागतिक बाजार, जागतिक गुंतवणूक आणि जागतिक अर्थकारण एका आर्थिक कोंडीत सापडले आहेत, हे नक्की.

## राशिभविष्य
मंगळवार, १३ मे २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख कृष्ण प्रतिपदा शके १९४७. चंद्र नक्षत्र विशाखा. योग परिघ, चंद्र राशी वृश्चिक, भारतीय सौर २३ वैशाख शके १९४७ म्हणजेच मंगळवार दिनांक १३ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०४, मुंबईचा सूर्यास्त ७.०४, मुंबईचा चंद्रोदय ७.४८, मुंबईचा चंद्रास्त ६.०९, राहू काळ ३.३९ ते ५.२७, नारद जयंती, शुभ दिवस, सकाळी ९.०८ नंतर.

### ॥ भविष्य ॥

**मेष :** कुटुंबासाठी खर्च कराल.

**वृषभ :** व्यवसाय-धंद्यात भरभराट होईल.

**मिथुन :** आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कर्क :** इतरांना मार्गदर्शन करू शकाल.

**सिंह :** आपल्या मतास प्राधान्य मिळेल.

**कन्या :** सार्वजनिक कामात प्रतिष्ठा लाभेल.

**तूळ :** आरोग्य चांगले राहील.

**वृश्चिक :** सरकारी कामे विनाविलंब पूर्ण होतील.

**धनू :** आपल्या कामाचे कौतुक होईल

**मकर :** नोकरीत सर्वांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ :** व्यवसाय-धंद्यातील प्रगती चांगली राहील.

**मीन :** एखादा फायद्याचा सौदा हाती येईल.

## जनसंवाद

### दहशतवाद्यांच्या छावण्या उद्ध्वस्त

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पर्यटन स्थळी २२ एप्रिल रोजी आलेल्या पर्यटकांमधील हिंदू धर्मातील पर्यटकांना त्यांच्या कुटुंबीयांसमोर २६ पर्यटकांना ठार केले होते. त्यात महाराष्ट्र राज्यातील सहा पर्यटक होते. या घटनेचे तीव्र पडसाद देशभरात उमटले. ७ मे २०२५ रोजी मध्यरात्री १.०० ते १.३० पर्यंत अर्ध्या तासात पाकिस्तान आणि पीओकेमध्ये घुसून भारतीय सेनेने ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यात १०० दहशतवादी ठार झाले. भारतीय सेनेने सकाळी भारतीय सेनेच्या इतिहासात पहिल्यांदाच दोन महिला लष्करी अधिकाऱ्यांनी या घटनेचा वृतांत मांडला. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि वायुदल आणि आर्मीच्या महिला अधिकारी कर्नल सोफिया आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी भारतीय सैन्याचे शौर्य जगासमोर मांडले. भारताने पाकिस्तानच्या भूमीवर 'ऑपरेशन सिंदूर' जोरदार मोहीम राबवून दहशतवादी अतिरेक्यांना जशास तसे उत्तर दिले. त्या आधी सिंधु जल कराराला स्थगिती दिली. पाकिस्तानशी व्यापार बंदीचा निर्णय घेतला. पाकिस्तान नेहमीच भारता विरुद्ध कुरापती करीत असतो. देशभरात अनेक वर्षे दहशतवादाने थैमान घातले आहे. सर्व धर्मीय भारतीयांची व सर्व राजकीय पक्षांची एकच इच्छा आहे. पाकचा कायमचा बंदोबस्त करा आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. पंतप्रधानांनी या मोहिमेला सिंदूर ऑपरेशन असे नाव दिले आहे. आमच्या माय भगिनींचे कुंकू पुसले यांचे दुःख कायम स्मरणात राहील पण भारतीय सैन्याने जशास तसे उत्तर दिले याचा अभिमान भारतीय नागरिक म्हणून सर्व भारतीयांना आहे.

**- महादेव गोळवसकर,** कुर्ला, मुंबई

### सिंदूर नावाने कोणी बाजार मांडू नये...

ऑपरेशन सिंदूर या नावाच्या मोहिमेंतर्गत भारताने पहलगाम या हल्याचा बदला घ्यायला सुरुवात केली आणि पाकिस्तानी शहरांत क्षेपणास्त्रे डागत तसेच त्यांची संदेश यंत्रणा नाकाम करत शत्रूला धडा शिकवला. याचे भांडवल करत काही चित्रपट, मालिका, निर्माते, उद्योजक यांनी ऑपरेशन सिंदूर या ट्रेडमार्कसाठी अर्ज केल्याचे समोर आले आहे. वास्तविक पाहता पहलगाम येथे दहशतवादी हल्यात अनेक विवाहित महिलांच्या पतीना मारण्यात आले त्यांचा कुंकू पुसण्यात आला त्याचा बदला घेवून न्याय द्यायचा अशा अर्थाने ऑपरेशन सिंदूर हे भारतीय सैन्य दलाने नाव दिले आहे. मात्र याचा प्रसार करायचा म्हणून या नावाचा बाजार , व्यापार मांडणे ठीक नाही. आपल्या भारतीय सैन्य दलाने जीवाची बाजी लावून हे ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले आहे आणि त्याचा कशाही प्रकारे व्यापार मांडणे योग्य वाटतं नाही सिंदूर हे नांव मनोरंजनासाठी आहे का ? याचा गांभीर्याने विचार करायला हवा. कुंकू हे भारतीय महिलांचं सौभाग्याचं लेणं आहे याला भारतीय संस्कृतीमध्ये पवित्र आणि मानाचं स्थान आहे त्यामुळे ते कायम अबाधित रहाणेसाठी संबंधितांनी कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये !

**- राजू जाधव,** मांगूर जि. बेळगाव

### 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे'

समर्थांनी म्हटले आहे की "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे" याचा अर्थ आहे की, नुसत्या बोलण्याने किंवा दिखाऊपणाने काहीही उपयोग होत नाही. या पंक्तीस शोभून दिसणारी काही राजकीय नेते आपल्या राज्यात विशेषतः आजूबाजूला वावरताना सहज दिसतात. यापैकी एक उबाठा पक्ष प्रमुख आणि त्याच पक्षाचे प्रवक्ते, कुठल्याही समयी, कोणत्याही प्रसंगी, कसल्याही विषयावर अगदी अधिकारवाणीने भरभरून बोलत राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य. समोरच्या व्यक्तीची मनस्थिती अथवा परिस्थिती याचे भान न ठेवता आपला एकतर्फी बोलत राहत आपली प्रतिक्रिया देत रहाणे जसे काही सर्व जगाची हुशारी यांच्या कडेच देवाने दिलेली आहे. दुसरे म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे, यांच्या बाबतीत काहीच भरोसा नाही. कुठली भूमिका घेतील, केव्हा सोडतील याचा पत्ता लागत नाही. यांची राजकीय भूमिका कधीच पक्की नसते. आज त्यामुळे राजकारणात धरसोड वृत्ती साठी ते प्रसिद्ध आहेत. आपल्या भाषणात जोरदार टिंगल करत आपल्या विरोधकांची त्या द्वारा टर उडविणे या पलीकडे पुढे याची गाडी कधीच पुढे सरकत नाही. परिणाम निवडणूक निकालात जागा शून्य मिळतात. जेंव्हा कोणीही इतरांपेक्षा आपल्या ज्ञानाची कक्षा किती विस्तृत आहे हे दाखवण्याचा अट्टाहास बाळगतात आणि आपल्या बोलण्याच्या कलेला स्वतःचे बलस्थान समजू लागतात. या अतिरेकाचा परिणाम म्हणजे सर्वसामान्य लोक यांना आपल्या करमणुकीसाठी समजतात.

**- अविनाश देशपांडे,** पुणे

### इंटरनेट वापरताना सावधगिरी बाळगणे हिताचे

डिजिटल क्रांतीच्या जमान्यात इंटरनेटवर सोशल मीडियाच्या माध्यमातून एखाद्याने वैयक्तिक क्षण इतरांना शेअर करणे, ही इतकी सामान्य बाब झाली आहे की, लग्नासारखे शुभकार्य असो, शाळा, महाविद्यालयांच्या परीक्षांचे निकाल लागलेले असोत, लगेचच त्याचे फोटो सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर केले जातात. यामधून कित्येकदा स्वतःबरोबर इतरांचीही वैयक्तिक माहिती हळूहळू इंटरनेटवर जमा होते. अशा प्रकारे इंटरनेटवर गोळा होणाऱ्या माहितीला डिजिटल सावली, डिजिटल पाऊलखुणा किंवा इलेक्ट्रॉनिक फूटप्रिंट म्हणजेच 'डिजिटल फूटप्रिंट' असे म्हटले जाते. इंटरनेटवर अनवधानाने, अभावितपणे किंवा गाफीलपणे गोळा झालेल्या या माहितीच्या डिजिटल फूटप्रिंटचा प्रसंगी कोणीही वापर करू शकतो हे आपल्या गावीही नसते. सध्याच्या घडीला अनेक कंपन्या नोकरीवर ठेवताना त्या व्यक्तीच्या प्रोफाइलवरून त्याचे डिजिटल फुटप्रिंट तपासतात. विवाहासाठी स्थळे पाहताना वर-वधूंचे डिजिटल फुटप्रिंट्स पाहिले जातात. शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचा ऑनलाइन वावर कसा आहे ते तपासले जाते. दुसरीकडे सायबर गुन्हेगारसुद्धा डिजिटल फूटप्रिंटचा फायदा घेऊ शकतात. त्यामुळे इंटरनेट वापरताना ऑनलाइन जगात वावरताना आपण काय क्रियाकलाप करतो, त्याच्या पाऊलखुणा डिजिटल फूटप्रिंटच्या स्वरूपात उमटत असतात. त्यामुळे इंटरनेट वापरताना सावधगिरी बाळगणे हिताचे आहे.

**-प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### अफझल्याने पुन्हा पाठीत खंजीर खुपसला

दहशतवादी पाकिस्ताने हिंदुस्थानच्या ताकदीला घाबरून दुपारी तीन वाजल्यापासून इतर राष्ट्रांना मध्यस्तीला घेऊन युद्ध विरामाचे प्रयत्न सुरू केले आणि संध्याकाळी पाच वाजता दोन्ही देशाकडून युद्ध विराम झाला. त्यांच्या बातम्या सगळ्या दूरचित्रवाणीच्या वाहिन्यावर झळकू लागल्य सगळीकडे आनंदाचे वातावरण दिसू लागले आणि म्हणत म्हणता तीन तासांत आठ-साडेआठच्या सुमारास पाकिस्तान पुन्हा शस्त्रसंधीचे उल्लंघन करत हिंदुस्थानच्या पाठी खंजीर खुपसला आणि सीमारेषेवर गोळीबार सुरू केल त्यांच्या बरोबर ड्रोन हल्लाही सुरू केला पण तो हे विसरल की हिंदुस्थानच्या पाठीत खंजीर खुपसला, तर हिंदुस्था आजही पाकिस्तानचा कोथळा बाहेर काढण्यास समर्थ आहे पाकिस्तान पुन्हा पुन्हा शांततेच्या बैठका घेऊन पुन्हा पुन्ह दहशतवादी हल्ला करून आणि सीमारेषेवर गोळीबार करत राहणार आहे पाकिस्तानला दहशतवादी राष्ट्र घोषित करू एकदाच दहशतवाद ठेचून गाडला पाहिजे.

**- मयूर प्रकाश ढोलम,** जोगेश्व

### खेळाडूंनी अचानक निवृती का घेतली?

रोहित पाठोपाठ आता विराटही निवृत्त झाल्याने भारताल कसोटी संघात मोठा तोटा बसणार आहे. या दोन्ही खेळाडूं अचानक निवृती का घेतली? बीसीसीआयने यांना येत्य कसोटी मालिकेसाठी खेळण्यास का थांबवले नाही? दोघेही तंदुरुस्त आहेत. रोहित शर्मा पाठोपाठ विराट कोहली कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाल्याने भारतीय संघाला अनुभव खेळाडूंची उणीव जाणवणार आहे. विराट हा १०० हून अधि कसोटी सामने खेळलेला अत्यंत अनुभवी खेळाडू होत भारताच्या क्रिकेट इतिहासात एक तेजस्वी अध्याय लिहून कोहलीने शांतपणे आणि ठामपणे या यशस्वी प्रवासाचा शेव केला आहे. या दोन्ही खेळांडूनी निवृती घेतल्याने भारती क्रिकेट बोर्डाचे मोठे नुकसान झाले आहे.

**- विवेक तवटे,** कळवा, ठा

# पन्नाशीच्या उंबरठ्यावर



ओंजळ
पल्लवी अष्टेकर



आत्ताच आमच्या ओळखींमध्ये अनेक मंडळींची पन्नाशी पूर्ण झाली, हळूहळू आपण पण पन्नाशीकडे निघालो आहोत हे लक्षात आले. पन्नासपासून एक नवीन आयुष्याची सुरुवात आहे आणि अनेक गोष्टी आयुष्यात बदलणे गरजेचे आहे, हा लेख सर्व पन्नाशीला धडकणाऱ्या असलेल्या मंडळींसाठी आहे.

माझ्या परिचयातल्या गौतमी काकू आज पासष्ठीच्या वयात आहेत. अनेकदा आम्ही दोघी वेगवेगळ्या गप्पा करतो. त्या जरी मला वयाने ज्येष्ठ असल्या तरी गप्पा मारण्यासाठी आमच्या आड कधी वय आले नाही. गौतमी काकूंना दोन मुली व एक मुलगा आहे. त्यांनी आपल्या दोन्ही मुलींची व मुलाचे लग्नं करून दिले. त्यांचा मुलगा व सूनबाई नोकरी करतात. त्यांच्या पतीचे त्यांच्या वयाच्या बासष्ठीला निधन झाले. गौतमीताई एका शाळेत शिक्षिका म्हणून काम करायच्या. त्यामुळे एकप्रकारचे त्यांचे जीवन साचेबद्ध होते. आता त्यांचे आयुष्य म्हातारपणाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे. गौतमीताईंसोबत बोलताना मला कधीही त्यांच्याकडून निराशायुक्त शब्द ऐकायला मिळत नाहीत, जणू उत्साहाने वाहणारा धबधबा. कविता करणाऱ्या, लेख लिहिणाऱ्या गौतमीताईंबाबत माझे कुतूहल वाढतच होते. एकदा मी त्यांना विचारले, "तुम्ही इतक्या उत्साही कशा?''

"अगं, वयाच्या अंदाजे पन्नाशीपासून मी काही गोष्टी माझ्या मनावर ठसविल्या. मी शाळेत नोकरी करत असताना नेहमी मुलांमध्ये राहायचे. त्यामुळे त्यांच्यातील चैतन्य, उत्साह मला गवसला. मी स्वतःसाठी काही तत्त्वे जाणीवपूर्वक पाळायची ठरविले. माझ्या सुनेशी-मुलाशी वितुष्टं न येता सर्वांचे राहणे आनंदमय कसे होईल हा विचार मी कायम मनात ठेवला. परगावी असलेल्या माझ्या मुलीदेखील आपापल्या व्यापातून मला भेटायला येतात. आम्ही हसून-खेळून वावरतो. त्यामुळे आयुष्य मला कधी कंटाळेवाणे वाटले नाही. माझे पती आपला व्यवसाय सांभाळून स्वतःच्या वृद्धं आईची सेवा करायचे. मुलांनीही लहानपणापासून हेच पाहिले. आता मुले आपला आदर करतात या विचाराने मला बरे वाटते. शिवाय माझ्या मुलाच्या व सुनेच्या संसारात किती लुडबुड करायची हे मी सुरुवातीपासून ठरविले होते. त्यामुळे आताचा काळ मी सुखाने काढू शकते". गौतमीताईंच्या बोलण्यातून मला खूप साऱ्या गोष्टी समजल्या. उतारवयात आपले जीवन कसे ठेवायचे हे जणू त्यांनी सांगितले.

बँकांचे आर्थिक व्यवहार, पोस्टाचे व्यवहार, म्युच्युअल फंडस्, इन्शुरन्स पॉलिसीज अशा गोष्टी स्त्रियांनी जाणून-शिकून घेणे याला फारसे महत्त्व त्यांनी दिलेले नसते. 'मुले परदेशी स्थाईक' अशी कितीतरी जोडपी आपण पाहतो. अनेकदा आपली बँकांची-पोस्टाची कामे मुलांवर, नातवडांवर सोपवून ते मोकळे होतात. विशेषतः स्त्रियांनी आर्थिक व्यवहारात लक्ष घालणे जरूरीचे आहे. नाहीतर वृद्धापकाळी आपल्याला यातले काहीच कळत नाही अशी मनाची स्थिती होऊन जाते. तसेच आजकालच्या नवनवीन तंत्रज्ञानाविषयी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. नाहीतर आपण अगदीच कालबाह्य झाल्याची जाणीव होते.

काही वेळा एकट्याने आयुष्य काढणे वृद्धांना नकोसे वाटते. अशावेळेस ते केअर सेंटरचा आसरा घेतात. आमच्या परिचयातील एक आजी तीन मुले असूनही एकट्याच केअर टेकरच्या मदतीने आयुष्य काढत आहेत. त्यांना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. कधी एखादे आजारपणं उद्‌भवले, तर त्या खूप कावऱ्याबावऱ्या होतात. घाबरून जातात. मग तेवढ्यापुरते चार दिवस मुले त्यांचे करतात आणि आपल्या घरी निघून जातात. पण आईला कायमस्वरूपी स्वतःच्या घरी घेऊन जाण्याचे नावच काढत नाहीत. अशा उतारवयात त्यांना एकटे राहावे लागणे हे वृद्धं पिढीला न पचणारे आहे.

अनेक वृद्धमंडळींचा "वेळ कसा घालवू" असा प्रश्नं डोक्यावर असतो. अशा मंडळींसाठी डे-केअर हा पर्याय चांगला असू शकतो. काही डे-केअर संस्था ९ ते ५ अशा वेळेत चालतात. तिथे झेपतील-जमतील अशा वेगवेगळ्या उपक्रमात वृद्धांना सहभागी होता येते. त्यांची नाश्ता व दुपारच्या जेवणाची सोय असते. गप्पा-गाणी यातून वेळ जातो. विविध उपक्रमांमध्ये मान्यवर येऊन काही गोष्टी शिकवतात. आपण म्हातारपणापर्यंत टेकलो हे अनेकांना पटत नाही, पण त्यामुळे निर्माण होणारे ताण-तणाव टाळता आले पाहिजेत. ९ ते ५ डे-केअरची वेळ संपल्यावर ही मंडळी आपापल्या कुटुंबात जातात. यामुळे वृद्धापकाळात आपला वेळ पण जातो व पुन्हा आपण आपल्या कुटुंबाशी जोडले जातो ही भावना आशादायक असते. त्याने मनाला पुन्हा उभारी येते.

आम्ही मालाड येथील मठात जप करण्यासाठी जातो, तिथे एक आजी नेहमी जप करत असतात. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी एक स्मित हास्य असते. त्यांच्या कानांना ऐकू येत नाही; परंतु त्यांचा हसतमुख चेहरा समाधानाने झळकत असतो. मनापासून जप करण्यात त्यांचा दिवस जातो. सर्वांना या आजींचा सहवास आनंददायी वाटतो. आपल्यालाही वृद्धापकाळात आपले मन समाधानी ठेवता यावे, जेणेकरून आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींना त्रास होणार नाही. त्यासाठी जपाची सवय होणे गरजेचे आहे. ही सवय मनाला पन्नाशीतच लावायला नको का?

खास करून पन्नाशीच्या आसपास स्त्रियांसाठी हा काळ "एम्टी नेस्ट पिरिएड" असतो. लहानपणी जे मुल सर्वस्वी आईवर अवलंबून असते, ते मुल आता कॉलेज शिक्षण संपवून आपापल्या उद्योगाला व्यवसायाला लागते. आपली पिल्लं स्वावलंबी होऊन घरट्यातून मुक्त होतात. अशावेळेस बायकांना आपल्या मुलांसाठी आपली गरज संपली अशी भावना मनात निर्माण होते. यातून काहीसे नैराश्य येण्याची शक्यता असते. या काळात त्यांनी सहनशीलतेने वागणे जरूरीचे आहे. तसेच येणाऱ्या वृद्धापकाळासाठीची तयारी पन्नाशीच्या आसपास पोहोचल्यानंतर व्हायला हवी. हे मनावर ठसविणे कठीण असले तरी अशक्य नक्कीच नाही. त्यामुळे रिकाम्या वेळात आपल्या आवडी-निवडी व छंद जोपासणे हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मन ताजेतवाने व आनंदी बनते.

तसेच पन्नाशीनंतर आरोग्य टिकवून ठेवायचे असेल तर नियमितपणे व्यायाम, योगाभ्यास या गोष्टी करणे जरूरीचे आहे. तसेच वय वाढत जाईल तसे हृदयविकार, मधुमेह, संधिवात, हाडे ठिसूळ होणे अशा रोगांची शक्यता वाढते. डोळ्यांच्या समस्या जसे की मोतीबिंदू, काचबिंदू या वयानुसार येणाऱ्या समस्या असू शकतात. कमी हालचाली, तोल न सांभाळता येणे, पडण्याची भीती या वयात होण्याची शक्यता दाट असते. नैराश्य, अस्वस्थता विविध कारणांनी येऊ शकते.

जसे की तब्येत, समाजापासून तुटक वागणे किंवा आर्थिक काळजी, वय वाढत जाईल तसे विस्मरण, वैचारिक क्षमतेवर परिणाम या गोष्टी घडतात. या सर्वांपासून येणाऱ्या ताण-तणावांवर मात करणे आवश्यक आहे. आपले मन ताजेतवाने ठेवण्यासाठी वाचन, नवीन शिकण्याच्या गोष्टी आत्मसात करणे, छंदांमध्ये मन रमविणे यातून वैचारिक क्षमता स्थिर ठेवण्यास मदत होईल. आपले मित्र-मैत्रिणींसोबत जोडले जाण्याने एकटेपणाच्या समस्या दूर होतील. आर्थिक तरतूद, निवृत्तीनंतरचा आराखडा, भविष्याबद्दल सुरक्षितता या गोष्टी या वयात महत्त्वपूर्ण काम करतात. आपल्या संतुलित जीवनाची गुरूकिल्ली आपणच आहोत. चला तर मग, वयामुळे येणाऱ्या समस्या व त्यावरचे उपाय यांना आपण धाडसाने सामोरे जाऊ शकतो.

# ... झाडे भरात आली!



नॉस्टॅल्जिया
श्रीनिवास बेलसरे



तारुण्यातील पहिले प्रेम अनावर असते. तरी ही भावना पूर्वी लज्जेशी, संकोचाशी, संयमाशी जोडलेली होती. त्यामुळे प्रियाराधन, प्रियकर-प्रेयसीची पहिली भेट, प्रेमसंवाद या गोष्टी सहजसाध्य नव्हत्या. एकांत आणि प्रणय तर खूप दूरच्या गोष्टी! त्यामुळे या सर्वांची केवढी अपूर्वाई असायची! खूप तहान लागल्यावर अनपेक्षितपणे थंडगार पाणी मिळाले तर जितका आनंद होतो तितकाच उत्कट आनंद आधी वंचना आणि अनेक अडचणींनंतर सफलता मिळालेल्या प्रेमाचा असायचा. त्या प्रेमाची लज्जत काही औरच असायची. कदाचित त्यामुळेच ते प्रेम खूप टिकावू असायचे. ते प्रेम आयुष्यभर मनाच्या गाभाऱ्यात तेवत राहणारा अनुभव बनायचे, मग ते सफल होवो की शेवटी कायमच्या ताटातूटीत संपो!

हल्लीसारखे तेव्हाचे प्रेम "हेलो आय ॲम अमुकअमुक" ने सुरू होऊन, काही महिन्यांतच "वेल, नाऊ वी मस्ट ॲडमीट, वी कांट गेट अलाँग, इट्स टाईम फॉर ब्रेकअप!" अशा सवयीच्या कोरड्या निरोपाने संपत नसायचे! कारण आवडलेल्या व्यक्तीपुढे प्रेमाचा प्रस्ताव मांडायला, तो दुसऱ्या बाजूने स्वीकारला जायलाच कितीतरी वेळ लागलेला असायचा. तोवर दोघांच्या मनात केवढे तरी विचार येऊन गेलेले असायचे. परस्परांच्या मनात भेटीची ओढ असायची, एकटेपणाची घालमेल आणि पुढच्या संभाव्य रोमांचक क्षणांची एकेकट्यानेच पाहिलेली रम्य स्वप्ने असत. मनात तिच्या किंवा त्याच्याविषयी एक अतर्क्य आकर्षण रुजलेले असायचे. प्रत्यक्ष भेट व्हायच्या आधीच त्या व्यक्तीत केवढी तरी भावनिक गुंतवणूक व्हायची. ती सोडणे जवळजवळ अशक्यच असायचे. आयुष्यात पुढे कायमचे वेगवेगळ्या वाटेने जावे लागले तरी त्या आठवणी कधीच विसरल्या जात नसत.

मंगेश पाडगावकर हे अशा तरल भावना अत्यंत नाजूकपणे सजवणारे रोमँटिक कवी! त्यांची प्रेयसीच्या अशाच भेटीवरची एक कविता आहे. यशवंत देवांनी संगीत देऊन तिचे एक सुंदर भावगीत केले. देवांनी कवितेतील रोमान्सपेक्षा कदाचित तिच्यातली सूचक, संयत अभिव्यक्ती महत्त्वाची वाटली असेल म्हणून त्यांनी अतिशय पातळ आवाज असलेल्या अरुण दातेंची निवड केली असावी.

पावसाळ्यातल्या धुंद वादळी वातावरणात झालेल्या त्या रोमांचक भेटीचे वर्णन पाडगावकर कसे करतात पाहा-

**जेव्हा तिची नी माझी**
**चोरून भेट झाली,**
**झाली फुले-कळ्यांची,**
**झाडे भरात आली!**
**जेव्हा तिची नी माझी...**

यशवंत देवानी अरुणजींना ध्रुवपदानंतर जे "हं हं हं हं" करायला लावले आहे त्यामुळे गाण्याची लज्जत अजूनच वाढली. या नुसत्या मुग्ध "हं हं हं हं."मुळे गाण्यातील प्रियकर या भेटीनंतर किती खूश आहे ते श्रोत्यापर्यंत सहज पोहोचते! मग नकळत तोही गाणे गुणगुणू लागतो. हे सामर्थ्य असते संगीतकाराचे!

मंगेशजींचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते चित्रमय शैलीत लिहायचे. त्यांची लेखणी एक कुंचला बनून वाचकाच्या मनाच्या भव्य कॅनव्हासवर वावरू लागते तेव्हा ते किती विविधरंगी आकार, आभास चितारतात, अतिशय मोहक असे विभ्रम निर्माण करतात. बाह्य मनाला ते नेहमी कळतेच असे नाही. मात्र त्यांचा केवढातरी प्रभाव रसिकाच्या सुप्त मनावर पडून जातो! आणि तोही कवीच्या अनुभवात गुंततो. गीताच्या पुढच्या ओळी कसा चित्रमय आभास निर्माण करतात पाहा-


**दूरातल्या दिव्यांचे मणिहार मांडलेले,**
**पाण्यात चांदण्याचे आभाळ सांडलेले.**
**कैफात काजव्यांची, अन पालखी निघाली,**
**झाली फुले कळ्यांची, झाडे भरात आली.**
**जेव्हा तिची नी माझी...**

म्हणजे जणू या भेटीमुळे कवीच्या मनात तिला भेट द्यायच्या मणीहाराचे नियोजनही सुरू झाले की काय? पण तो तसे थेट म्हणत नाही. उलट आजूबाजूच्या भोवतालचे वर्णन करून अगदी अस्पष्टपणे तेच सूचित करतो आहे असे वाटत रहाते. तसे कवीच्या भावविश्वात काय काहीही अशक्य नसतेच! मग एखादे वादळ येऊन गेल्यावर जशी प्रचंड पडझड झालेली असते तसे दोघांचे सगळे भावविश्व त्या भेटीने किती हादरले होते ते दर्शवण्यासाठी पावसाच्या साठलेल्या पाण्यात आपल्याला चक्क चांदण्यांचे आकाश सांडलेले दिसते.

आता पाऊस थांबलाय, सगळा आसमंत स्तब्ध आहे आणि त्यात काजव्यांचा एक थवा हळूहळू उडत चाललाय. त्याला पाडगावकर जणू सावकाश जाणाऱ्या राणीच्या पालखीची उपमा देतात. वर हेही सांगतात की तिच्या नि माझ्या भेटीचा आजूबाजूच्या झाडांनाही इतका आनंद झाला की त्यांच्या कळ्यांना त्यांनी लगेच उमलायला लावले. कळ्यांची क्षणार्धात फुले झाली कारण आमच्या प्रेमाच्या पावसात झाडेसुद्धा बेभान झाली होती.

पाडगावकर म्हणजे हा असा कहर असतो, शब्दांचा, कल्पनांचा, प्रतिमांचा आणि आभासांचा! तो अनुभव लौकिकाचा कोणताही विचार न करता कवीबरोबर स्वतःला झोकून देऊन घ्यायचा असतो.

वादळी सायंकाळी झालेली ही भेट. पावसाच्या पाण्यात सांडलेले आभाळ आणि काजव्यांची पालखी नुकतीच येऊन गेलेली! सगळीकडे अंधारून आलेले. त्या अंधारात कवीच्या मनात दरवळत राहतो तो तिच्या



केसातील जुईच्या फुलांचा गंध! अहाहा! कवीची प्रेयसीशी झालेली ही भेट इतकी आवेगी आणि बेधुंद होती की दोघांच्या श्वासांची लयसुद्धा तीव्र झाली. दोघांनी जणू त्या मिठीत एकमेकाला समर्पितच करून टाकले. मनातील इच्छा, आकांक्षा, अभिलाषा, भावभावनांच्या कळ्या त्या आवेगी अलिंगमनात पूर्ण फुलल्या. अर्धोन्मीलित कळ्यांची प्रसन्न, कृथार्थ फुले झाली.

**केसांतल्या जुईचा तिमीरास गंध होता,**
**श्वासातल्या लयीचा आवेग अंध होता.**
**वेड्या समर्पणाची वेडी मिठी मिळाली,**
**झाली फुले कळ्यांची, झाडे भरात आली. जेव्हा तिची नी माझी...**

दोघे भेटीसाठी, कितीतरी गोष्टी एकमेकांना सांगण्यासाठी, आतुर झाले होते, पण त्यांच्यात काही संवाद झालाच नाही. एक गूढ मौनच पूर्ण तृप्ती देऊन गेले. कारण नुसत्या स्पर्शाने झालेला तो उत्कट संवाद किती सुखद होता, अवर्णनीय होता. जणू त्यावेळी लाखो ताऱ्यांचे चांदणे चमचमू लागले होते, आतही आणि बाहेरही! काळाची टिकटिक स्तब्ध झाली, तो थांबलाच आणि दोघांना फुलांच्या एका ताटव्याने झाकून टाकले.

**नव्हतेच शब्द तेव्हा, मौनात अर्थ सारे.**
**स्पर्शात चंद्र होता, स्पर्शात लाख तारे.**
**ओथंबला फुलांनी अवकाश भोवताली,**
**झाली फुले कळ्यांची, झाडे भरात आली. जेव्हा तिची नी माझी...**

जर तारुण्यातील भावनांची उत्कटता, ओढ, तहान, अतृप्ती, नॉस्टॅल्जिक हुरहूर पुन्हा अनुभवायची असेल, तर मंगेश पाडगावकर या कवीला पर्याय नाही!

# लोकसंस्कृतीतील महत्त्वाचे विधीनाट्य

विशेष
लता गुठे



लोक वाङ्‌मयातील प्रयोगसिद्ध रूपे आणि पारंपरिकता यांचा खूप जवळचा संबंध असतो, ग्रामीण संस्कृतीमध्ये लोकदैवत संप्रदायाला जेव्हापासून महत्व प्राप्त झाले. त्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी विधीनाट्याची संकल्पना उदयाला आली.



आदीम काळापासून जेव्हा माणसांचा समूह जंगलामध्ये राहत होता नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी निसर्ग देवतेच्या पूजाअर्चा तो करू लागला. पुढे लोक समूहाने राहू लागले. त्याचे रूपांतर गावांमध्ये झाले. गावाचे रक्षण करण्यासाठी मूर्तीपूजा उदयाला आली, यामध्ये शक्ती आणि शिवाची पूजा, प्रकृती आणि पुरुषाची पूजा अनेक लोकविधींमधून शतकानू शतके चालू आहे. आजही आपल्याकडे देवीला खंडोबाला प्रसन्न करण्यासाठी 'जागरण', 'गोंधळ' हे विधीनाट्य केले जाते. ज्यांचे खंडोबा आणि रेणुका माता कुलदैवत आहेत ते मुलाचा विवाह झाल्यानंतर नवीन सून घरात येते त्या वेळेला त्यांची संसारवेल वाढावी यासाठी नवोदित दांपत्याच्या हातून जागरण गोंधळाची पूजा केली जाते. ही देवतांची पूजा अनेक विधी विधानातून करण्याची प्रथा पिढ्यानपिढ्यापासून चालत आलेली आहे. यामध्ये गीत, नृत्य, नाट्य, संगीत, आदि कलांचा समावेश असतो. जागरणात गोंधळात वाघे मुरळी पूजा मांडून त्यासमोर मल्हारी देवाचं आख्यान लावतात. तसेच म्हाळसा आणि बानुबाई यावर आधारित असलेले गीते सादर करतात. वाघ्या वाद्य वाजवतो आणि मुरळी हातामध्ये घंटा घेऊन त्याच्या तालावर नाचते.

या विधी नाट्यांमध्ये जागरणाबरोबरच देवतेची प्रतिष्ठापना करतात. देवतेला आवाहन करतात तिचा प्रतिकात्मक संचार आणि निर्गमन या गोष्टी अंतर्भूत असतात. याचबरोबर गण, नमन, स्तवन, आवाहन, गवळणी, पदे, कथा, आरती आणि लंगर तोडीचा विधी हा गोंधळ जागरणासाठी विधीनाटकाचा अविष्कार क्रम असतो. यामध्ये घाटी, डिमडी, तुंतूने, मंजिरी म्हणजे (मोठा टाळ) या वाद्यांच्या साथीने जागरण सादर होते. तर संबळ, तुंतुने, मंजिरी, डफ आदि वाद्यांच्या साथीने गोंधळ सादर होतो. भराड हे विधीनाट्य डमरूच्या तालात सादर होते. तंतूवाद्य स्वरांची साथ करते, तर डमरू संबळ, दिमडी, डफ यासारखे वाद्य तालाची साथ करतात. यातून मनोरंजनही होते आणि मानसिक समाधानही मिळते. महाराष्ट्रातील लोकदैवत संप्रदाय आणि भक्ती संप्रदाय गुण्यागोविंदाने नांदले. हे विधीनाट्यातून पाहायला मिळते. खंडेरायाच्या म्हाळसा आणि बानू या दोन पत्नी त्यांची समस्या खालील ओवीमधून समोर येते...

खंडेराया तुला कसा घ्यावा वाटून
एक भाकरी त्याचे तुकडे केले दोन

असे वर्णन असलेली गाणी विधीनाट्यांमध्ये गायली जातात. गोंधळी एकाच वेळी गायन, निरूपक, कथेतील प्रमुख पात्र अशा भूमिका प्रभावीपणे सादर करत असतो. 'जांभूळ आख्यान' हा विधीनाट्याचा एक प्रकार मानला जातो. जांभूळ आख्यान नावाचे आख्यान परभणीचे गोंधळी महर्षी राजाराम भाऊ सादर करायचे, तेव्हा ते एकाच वेळी मुख्य गायकाची भूमिका करत असताना निरुपक व जांभूळ आख्यानातील द्रोपदी, कृष्ण आदी पात्रे साकार करायचे. अशाप्रकारे विविध प्रांतामध्ये अनेक लोककलाकार अशा प्रकारचे विधीनाट्य सादर करतात. तसेच महाराष्ट्रातील कोकणामध्ये दशावतार हे विधी नाट्य सादर केले जाते. दशावतार हे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रचलित लोकनाट्यप्रकार आहे. यात विष्णूच्या दशावतारांचे सादरीकरण करतात. यामध्ये संधिप्रकाश, देवपूजन आणि नाट्य यांचा समावेश असल्याने ते विधीनाट्य ठरते.

आदिवासी भागांमध्येही अनेक प्रकारचे विधीनाट्य पाहायला मिळतात. यामध्ये पालघर, ठाणे, जिल्ह्यातील आदिवासींचे समूह विधी व कौटुंबिक विधी म्हणजे वाघदेवाची वाघ्या पूजा, गावदेवी पूजामध्ये अनेक प्रकारची नृत्य सादर करतात. त्यामध्ये वाद्य वाजवून सामुदायिक नृत्य सादर करण्यासाठी बोहडा,




तारपा, मादळ, ढोल, नृत्य टिपरीनृत्य यांचाही सामूहिक विधीनाट्याचे प्रकार पाहायला मिळतात. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्येही विधीनाट्य भारतीय त्या त्या प्रदेशातील संस्कृतीनुसार विधीनाट्य सादर करण्याची प्रथा आहे. विधीनाट्य म्हणजे केवळ नाट्यप्रकार नव्हे, तर तो एक धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक अनुभव आहे. या नाट्यप्रकारांचा उगम धर्मकथांमध्ये, लोकश्रद्धांमध्ये व निसर्गपूजेच्या परंपरेत आहे. भारतात प्रत्येक प्रांतात त्याच्या विशेष धार्मिक व सांस्कृतिक सत्त्वामुळे वेगवेगळे विधी नाट्यप्रकार विकसित झालेले आहेत.

केरळमध्ये कथकली, थेय्यम आणि कूडियाट्टम कथकली हे पारंपरिक नाट्यप्रकार असून याचे मूळ धार्मिक विधींमध्ये आहे. यात महाभारत व रामायणातील कथा रंगमंचावर प्रकट केल्या जातात. यात अतिशय समृद्ध रंगभूषा, हस्तमुद्रा, पदन्यास आणि भावाभिनय यांचा समावेश असतो.

तामिळनाडूमध्ये तेरू कोठू आणि कोथू हे विधी नाट्याचे प्रकार आहेत. तेरू कोठु हा तमिळनाडूमधील एक विधीनाट्य प्रकार आहे. यात देवी-देवतांच्या कथा रस्त्यांवर मोठ्या जनसमूहासमोर सादर केल्या जातात. रामायण, महाभारत आणि स्थानिक पुराणे यावर आधारित कथा यामध्ये प्रमुख असतात. दक्षिण कर्नाटकामध्ये-यक्षगान हे विधिनाट्य प्रसिद्ध आहे. यामध्ये भव्य पोशाख, ड्रमसंगीत (चेंडे व मृदंग) आणि कथाकथन यांचा मिलाफ असतो. रात्रीच्या वेळेस, अनेक तास चालणारे हे नाट्य धार्मिक विधीप्रमाणे सादर केले जाते. विधीनाट्याचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे...भारतातील विविध प्रांतांतील विधीनाट्य परंपरा हा केवळ नाट्याचा प्रकार नसून संपूर्ण लोकजीवनाचा भाग आहे. यातून श्रद्धा, परंपरा, लोककथा व सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे दर्शन घडते. या परंपरांची जपणूक करणे म्हणजे आपली सांस्कृतिक समृद्धी टिकवणे होय.

# बलरामाकडून द्विविदाचा उद्धार



महाभारतातील मोतीकण
भालचंद्र ठोंबरे

श्रीमद् भागवत पुराणानुसार द्विविदा नामक एका वानराची कथा आहे. त्रेतायुगात रामायणातील सुग्रीवाच्या सेनेतील मैंदा नावाच्या वानराचा हा विशालकाय व महाबलाढ्य भाऊ होता. त्याच्या अंगी दहा हजार हत्तीचे सामर्थ्य होते. अर्थातच राम रावण युद्धात त्याचेही अमूल्य योगदान होते. लक्ष्मणाकडून आपल्याला मरण यावे अशी त्याची इच्छा होती.

पुढे द्वापार युगात तो नरकासुराचा मित्र होता. भगवान श्रीकृष्णांनी नरकासुराचा वध केल्याने त्याने यादवांविरुद्ध संघर्षाची भूमिका घेऊन यादवांविरुद्ध यादव नगरीत धुमाकूळ घातला. वृक्ष उखडवून टाकले, नदींची पात्रे वळविणे, मोठ्या शिळा व टेकड्या खचवून पायथ्याशी असणारी खेडी उद्‌ध्वस्त करणे, कधी कधी सागरामध्ये उड्या मारून अथवा हाताने सागरातील पाणी भूमीवर फेकून पूर समान परिस्थिती निर्माण करून तीरावरील खेडी उद्‌ध्वस्त करणे आदी कृत्ये केली. ऋषीमुनींच्या आश्रमातील यज्ञकुंडात मलमूत्र टाकून ते अपवित्र करणे, स्त्रिया पुरुष ऋषीमुनी आदींना डोंगराच्या गुहेत टाकून गुहेच्या तोंडावर मोठ्या शिळा ठेवून त्यांची तोंडे बंद करून त्यांचे प्राण घेणे, आदी भयानक कृत्येही तो करीत असे.

एके दिवशी तो रैवत पर्वतावर गेला. त्या ठिकाणी बलराम रेवती व असंख्य यादव स्त्री-पुरुष आनंद उत्सव साजरा करीत होते. तेथे या द्विविदाने आपल्या मर्कट लिला सुरू केल्या. तसेच यादव स्त्रियांकडे दगड धोंडे फेकून विकृत हास्य करू लागला. त्याने बलरामाचा मधु कलश पळविला व बलरामाची कुचेष्टा करू लागला. द्विविदाने प्रदेशाची केलेली नासधूस तसेच यादव स्त्री-पुरुषांची केलेली कुचेष्टा पाहून बलरामने आपला नांगर व मुसळ त्याच्यावर उगारले.

द्विविदाने एक मोठा वृक्ष उपटून बलरामाच्या डोक्यावर मारला. बलरामाने तो प्रहार सहन करून द्विविदावर मुसळाचा प्रहार केला. त्यामुळे त्याचे डोके फुटून रक्त निघू लागले. मात्र त्याची पर्वा न करता हा महाकाय वानर मोठे मोठे वृक्ष उपटून बलरामावर फेकू लागला. मोठमोठ्या शिळाचेही प्रहार त्याने बलरामावर केले. मात्र बलरामने त्या सर्वांचा चकनाचूर केला. द्विविदाने आपल्या लांब हाताने बलरामाच्या छातीवर प्रहार केला. तेव्हा बलराम व द्विविदामध्ये मुष्टीयुद्ध झाले. दोघांनीही एकमेकांवर वार प्रति वार केले. अखेर बलरामने द्विविदाच्या मानेवर प्रहार करताच तो वानर मरण पावला. त्याच्या जमिनीवर पडण्यामुळे तो पर्वत, वृक्ष व मोठ्या शीलाखंडासहीत कंपायमान झाला. यादवांना सळो की पळो करणाऱ्या द्विविदाचा बलरामाने वध करताच यादवांसह सर्व देवतांनाही आनंद झाला.

भागवतातील ही कथा चांगले व वाईट यामधील संघर्षाचे प्रतीक आहे. त्याचप्रमाणे विकृत मनोवृत्तीने ग्रासीत व्यक्ती समाजाला कशा घातक ठरू शकतात याचेही हे उदाहरण आहे. म्हणूनच ही कथा सदगुणांचा दुर्गुणावरील विजयाचे प्रतीक मानले जाते.

# जगाला बुद्धांच्या तत्वज्ञानाची गरज

## पोलीस अधीक्षक नवनीत काँवत
## शिवणीत थायलंडच्या बुद्ध मूर्तीची झाली प्रतिष्ठापणा





पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:अवघे जग बौद्ध धम्माकडे वैज्ञानिक दृष्टिकोणातुन पाहते. त्यामुळे मानवी जीवन जगत असतात तथागत गौतम बुद्धाने दिलेले तत्वज्ञान अंगिकारले पाहिजे.असे मनोगत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी व्यक्त केले.बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे सोमवार (दि.१२) मे रोजी तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्ताने बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उपस्थित बौद्ध जनसमुदयास संबोधित करताना नवनीत काँवत बोलत होते. यावेळी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड तथा बुद्ध जयंती महोत्सवाचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो, कार्यक्रमाचे उदघाटक डॉ.भिक्खु उपगुप्त महाथेरो तर अध्यक्ष म्हणून डॉ.भिक्खु इंदवंस्स महाथेरो, प्रमुख उपस्थितीत भिक्खु चंद्रमुणी होते.प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु पय्यावर्धन तर प्रमुख पाहुणे म्हणून सीईओ आदित्य जीवने, नायब तहसीलदार सुहास हजारे, अधीक्षक अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे, इंजि बी. के. अदमाने उपस्थित होते.

पुढे बोलतांना नवनीत काँवत म्हणाले की, बुद्धाने या जगाला प्रज्ञा,शील, करुणा शिकविली. चक्रवर्ती सम्राट अशोक राजाने बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा जगात प्रचार आणि प्रसार केला. शिल्प आणि शिलालेखाच्या माध्यमातून बुद्धाचे तत्त्वज्ञान या जगात कायम जिवंत आहे आणि जिवंत राहील. भारत हा बुद्धाची जन्मभूमी आहे म्हणून आपल्या देशाची जगात ओळख आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपुर येथे बौद्ध धम्म दीक्षा देऊन बुद्धांचे तत्त्वज्ञान पुन्हा आपल्याला अवगत करून दिले आहे. आज शिवनी येथे तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होत आहे. येणाऱ्या काळात या पुण्यभूमीतून तथागताच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार आणि प्रचार होईल असे मनोगत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले तर सूत्रसंचालन दीपक भालेराव यांनी केले. यावेळी प्रा.डॉ. मनोहर सिरसाट यांच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. बुद्ध महोत्सवाला बीड जिल्ह्यासह राज्यभरातून बौद्ध उपासक–उपासिका, आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### धम्म रॅलीने वेधले लक्ष

तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची भव्य धम्मरॅली काढण्यात आली. या धम्म रॅलीत बौद्ध भिक्खू, बौद्ध उपासक उपासिका, आंबेडकरी जनता पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी झाली होती. त्यामुळे या रॅलीन बीड शहराचे लक्ष वेधून घेतले होते.

### बीड जिल्ह्यात सर्वात मोठी थायलंड येथील बुद्धमूर्ती!

बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे. सदरील मूर्ती थायलंड या देशातून आणण्यात आली आहे. बुद्ध महोत्सवाचे संयोजक पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या धम्म चळवळीतून ही मूर्ती बसविण्यात आलेली आहे.

# पाटोद्यात अवकाळी पावसाचा तडाखा

## कहर: शेतकऱ्यांच्या फळ पिकांचे मोठे नुकसान

पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा: पाटोदा तालुका व परिसरातील ग्रामीण भागात रविवारी सायंकाळी व सोमवारी दुपारी सुमारे २:१५ वाजता झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांवर संकट ओढावले आहे. या पावसासोबत आलेल्या वादळी वाऱ्यामुळे आंब्याच्या बागांसह इतर रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.पाटोदा सह ग्रामीण भागात आंब्याच्या झाडांवरील पोपट, फुलं आणि मध्यम आकाराची फळं झाडांवरून खाली पडली असून, त्यामुळे बागायतदारांचे मोठे



नुकसान झाले आहे. काही भागांत हरभरा, गहू, ज्वारी यांसारखी पिकंही या पावसामुळे प्रभावित झाली आहेत.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, हवामान खात्याकडून कोणतीही पूर्वसूचना न मिळाल्याने पिकांचे संरक्षण करणे पान २ वर

# धामणगाव परिसराला झोडपले

## फटका: वादळी वाऱ्यासह पाऊस



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:तालुक्यातील धामणगाव परिसरात सोमवारी दुपारनंतर झालेल्या वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. सलग दोन तास झालेल्या पावसामुळे शेतात पाणीच पाणी झाले. कांद्यासहित आंब्यालाही फटका बसल्याचे शेतकरी वर्गातून सांगण्यात येते.

आष्टी तालुक्यातील धामणगाव परिसरात सोमवारी दुपारी तीन वाजेनंतर वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची पान २ वर

# मलकापूर दत्त मंदिराचा वाद

## आक्रमक:लोमटेंच्या अमर उपोषणाचा पाचवा दिवस

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील मलकापूर येथील दत्त मंदिर देवस्थान व सुंदर लोमटे जमिनीच्या वादात दत्त मंदिराच्या अस्तित्वात नसलेल्या देवस्थान ट्रस्टने कागदपत्रे देवस्थानच्या खोट्या लेटर पॅड वर खोटी माहिती दिल्याने जमिनीच्या वादात धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे आदेश डावलून देवस्थानच्या नावे जमिनीचा फेरफार केल्याप्रकरणी संबंधित महसूल निर्णय विरोधात सुंदर लोमटे यांनी सुभाष महाराज लोमटे यांच्या समाधीस्थळी



दिनांक आठ मे पासून आमरण उपोषणाला बसले आहेत या उपोषणाचा पाचवा दिवस असून याकडे प्रशासनाने कोणत्याही प्रकारे व कसलीही दखल घेतली नाही मलकापूर येथील श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट आणि शेतकरी सुंदर लोमटे यांच्या जमिनीच्या वादाचे प्रकरण उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यालयात दाखल होते तसेच श्री दत्त मंदिर देवस्थान ट्रस्ट खोटे असल्याने देवस्थान ट्रस्ट बरखास्त केल्यानंतर एकनाथ लोमटे यांनी फेरफार क्र. ६६३ साठी खोटी कागदपत्र दाखल केल्याचा ठपका ठेवत काही बदल करण्याचे आदेश धर्मादाय आयुक्तांनी दिले होते लातूर येथील धर्मादाय आयुक्तांनी नवीन ट्रस्ट नेमण्याचे २८ डिसेंबर २०२३ ला जाहीर प्रकटन दिले होते त्यानंतर कोणत्याही ट्रस्ट विश्वस्त पान २ वर

# बुद्धांनी जगाला विज्ञानवादी दृष्टीकोन दिला

## डॉ. गोपाल बछिरे:लोणार बौद्ध विहारात बुद्ध पौर्णिमा



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:बुद्धांनी जगाला विज्ञानवादी दृष्टिकोन देऊन मानवतावादाचा संदेश दिला असे वक्तव्य प्रो.डॉ.गोपाल बछिरे यांनी केले. बुद्ध पौर्णिमेनिमित्त लोणार येथील बुद्ध विहारात श्री तानाजी अंभोरे यांनी आयोजित कार्यक्रमात डॉ. बछिरे बोलत होते डॉ. बछिरे पुढे म्हणाले इसवी सन पूर्व सहाव्या शतकात अंधश्रद्धा कर्मकांडचे थैमान माजले होते या अंधश्रद्धेला व कर्मकांडांना कंटाळून राजपुत्र गौतम सिद्धार्थने आपले परिवार, राज्य सोडून सत्याचा शोध घेण्यासाठी बिहार प्रांतातील गया या ठिकाणी बोधी वृक्षाखाली घोर तपश्चर्या केली व त्यांना तेथेच ज्ञानाची प्राप्ती झाली व सिद्धार्थ गौतम हे बुद्ध झाले म्हणून गया या शहराला बुद्धगया व सिद्धार्थ गौतमाला बुद्ध व बुद्धांनी पान २ वर

# जगाला युद्ध नाही तर बुद्ध हवा

## संघपाल नागवंशी:सुलतानपूर येथे बुद्ध जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:सुलतानपूर तालुका लोणार येथे तथागत भगवान बुद्ध जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम तथागत भगवान बुद्ध भारतीय घटनेतील शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यागमूर्ती माता रमाई, भारत देशाचे रक्षण करताना शहीद झालेल्या वीर जवानांच्या प्रतिमा समोर दीप,धूप, पुष्प पूजन करून, पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्रिशरण पंचशील घेऊन,तदनंतर दोन मिनिटं मोन पाळून देशाच्या रक्षणार्थ आपल्या प्राणाची आहुती देऊन, शहीद झालेल्या विर जवानांना मुक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. व शेवटी शरणंथ्य गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी उपस्थित




संघपाल नागवंशी मेहकर–लोणार विधानसभा नेते, अनित्य घेवंदे,बि. टी पनाड , मोरे साहेब, सुरेश पनाड,शुध्दोधन सरदार, केदार साहेब बिट जमादार,जाधव साहेब, राजेश भानापूरे पोलीस पाटील पती,संजय शेजुळ, प्रदीप मोरे,बिंबिसार पनाड, विशाल पनाड,बबन पनाड , सुनील शेजुळ, राहुल अवसरमोल,प्रसेंजित पनाड, संजय शेजुळ, अकाश घेवंदे,गुणवंत पवार, महिंद्र अवसरमोल, सिध्दोधन पनाड, पान २ वर

# कळंबमध्ये बुद्ध जयंती साजरी



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: वैशाखी बुद्ध पौर्णिमा विश्वाला शांतीचे संदेश देणारे महाकरूणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करून विनम्र अभिवादन केले कळंब शहरातील प्रत्येक बौद्ध विहारात जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली यावेळी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून शहरांमध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले होते व खाऊ म्हणून खिरीचे वाटप करण्यात आले सतपाल बनसोडे,सुनील गायकवाड,महादेव महाराज आडसूळ,शिवाजी शिरसाट,बंडूभाऊ बनसोडे, कुंदन गायकवाड,सुमित रणदिवे, शंकर कांबळे,राजाभाऊ गायकवाड, शहाजी शिरसाट, मोहन गायकवाड, कोमल धावारे, जीवन बचुटे, रसूल शेख,प्रमोद ताटे, विकास गायकवाड, मुकुंद साखरे, बजरंग धावारे, सौरभ गायकवाड, संभव बनसोडे , माणिक गायकवाड,प्रशांत हौसलमल यांच्यासह शहरातील बौद्ध पासक आणि बौद्ध पासीका यांच्यासह शहरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुरेशानंद शास्त्री
## नारळी सप्ताहास भाविकांची मांदियाळी

# परमार्थात खरे सुख मिळते

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:जीवनात प्रत्येकाशी प्रेमाने आणि आनंदाने रहा. जीवनात कुठल्याच गोष्टी कायमस्वरूपी राहत नाहीत म्हणून कुणाशीही कायम विरोधात राहू नका एकमेकांशी प्रेमाने आणि आनंदात रहा तसेच परमार्थात खरे सुख मिळते म्हणून ज्ञानयज्ञ सप्ताहात येवून भजन , कीर्तनाचे श्रवण करा तसेच जीवनात साधू संतांचा आर्शिवाद मिळाला की अनेक गोष्टी प्राप्त होतात असे प्रतिपादन श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाचे महंत हभप सुरेशानंदजी महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले.



गेवराई व शिरुर (का) तालुक्याच्या सिमेवर असलेल्या श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाच्या पहिल्या नारळी सप्ताहाचे पाथर्डी तालुक्यातील आडगाव येथे महंत सुरेशानंद महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सोमवार दि.१२ मे रोजी महंत सुरेशानंदजी म. शास्त्री यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने सांगता झाली. यावेळी त्यांनी संत नामदेव महाराज यांच्या दुः खाची निवृत्ती सुखाचे ते सुख । पाहतां श्रीमुख गोविंदाचे ।।१।। रंगणी रांगत गुलगुल बोलत ।असुर रूळत चरणांतळी ।।२।। नामा म्हणे हाती लोणीयाचा उंडा । गौळणी त्या तोंडा भुललिया ।।३।। या अभंगावर सुंदर असे निरुपण केले.

यावेळी व्यासपीठावर श्रीक्षेत्र सालसिध्द बाबा संस्थानचे महंत हनुमंत महाराज शास्त्री, आ.गोपीचंद पडळकर, आ. सुरेश धस , आ.मोनिकाताई राजळे, माजी आ.रामराव वडकुते , शिवदास बीडकर, भाजपा जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले, शारदाताई पांढरे , अशोक चोरमले, भारत शिंगाडे, बळीराम खटके , शिवप्रसाद खेडकर, एकनाथ हाटकर , तुकाराम हराळे यांच्या सह आदी संत– महंत टाळकरी , वारकरी , मृदंगाचार्य, पान २ वर

# पाटोदा शहरात बुद्ध जयंती

## नियोजन:धम्म रॅलीने वेधले लक्ष



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा :पाटोदा शहरात वैशाखी बुद्ध पौर्णिमेनिमित्त तथागत गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात साजरी करण्यात आली. भगवान बुद्धांच्या जीवनकार्याचा व धम्माचा शांतीदूत संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी शहरात 'संदेश रथ' काढण्यात आला.या निमित्ताने शहरातील विविध बौद्ध विहारांमध्ये धार्मिक कार्यक्रम, बुद्ध वंदना, धम्म गीतं आणि विचार सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात पांढऱ्या शुभ्र वस्त्रांनी सजलेले बौद्ध उपासक–उपासिका, युवक–युवती, महिला यांनी शहरातून शांती रॅली काढली. जय भीम, बुद्धं शरणं गच्छामि अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमास प्रा. विलास जावळे, सचिन जावळे, पान २ वर